

# श्रीसाईलीला


…र

किं. ५० पैसे

१९६८

# या अंकांत—

१ वेदमहर्षि पं. सातवळेकर.
२ मानव पापमुक्त होऊं शकतो.
३ साईबाबांच्या कांहीं संस्मरणीय आठवणी.
४ पालखीचा कार्यक्रम.
५ मनांत आलं कीं—
६ शिरडीचे श्रीसाईबाबा.
७ श्रीकेशवानंद सरस्वती.
८ मनानें भजावा भगवंत.
९ तूं पोरका समजूं नकोस.
१० संत नामदेव व योगिनी मीरा.
११ बाबांची लीला.



# श्री साई वाक्सुधा

संतकथा भक्तिभावपूर्वक ऐकणें व त्यांचें मनन करून त्याचा सतत निधिध्यास घेणें हें अत्यंत कल्याणप्रद असून त्यामुळें तुमचा परमार्थाचा मार्ग सहज मोकळा होईल. ज्याच्या ठिकाणीं प्रेमाचा लवलेश नाहीं असा माणूस जगांत सापडणें कठीण. प्रत्येकाला कोणाबद्दल तरी प्रेम वाटत असतेंच. कोणाला मुलांबाळांबद्दल, कोणाला पत्नीबद्दल तर कोणाला संपत्तीबद्दल. कोणी घरादाराचा तर कोणी मानसन्मानाचा भुकेला असतो. हे सर्वप्रकारचें प्रेम एकत्र येऊन जेव्हां भक्तिभावांत विलीन होते तेव्हां तें सत्कारणी लागतें व तुमच्या उद्धारास कारणीभूत होतें.

—श्रीसाईसच्चरित

---


## श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] सप्टेंबर १९६८ [ अंक ६ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# वेदमहर्षि पं. सातवळेकर

प्रिय वाचक –

गेल्या १।२ महिन्यांच्या कालावधींत दोन महाराष्ट्रीय महापुरुष आपणास सोडून गेले ही अत्यंत दुर्दैवी घटना होय. पहिले ह.भ.प.सोनेपंत तथा मामासाहेब दांडेकर व दुसरे वेदमहर्षि पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर हे होत. पूज्य मामा-साहेब दांडेकर यांच्यानंतर पं. सातवळेकर यांच्यावर मृत्युलेख लिहिण्याचा दुर्धर प्रसंग आमच्यावर ओढवला आहे.

पं. सातवळेकर हे अचाट कर्तृत्वाचे व असामान्य कोटींत ज्यांची गणना करतां येईल, असे थोर पुरुष होते. वयोमान व कर्तृत्त्व या दृष्टीनें त्यांची तुलना स्त्रीजीवनांत असामान्य क्रांति घडवून आणणारे महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्याशीं करतां येईल. ज्यांनीं जीवनभर लोककल्याणाच्या दृष्टीनें अचाट कर्तृत्त्व गाजविलें व शंभरी पलिकडे ज्यांचें वयोमान जाऊं शकलें अशीं हीं महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भारताला ललामभूत होऊन रहाणारी दोन माणसें महाराष्ट्रांत जन्माला आलीं हें केवढें आमचें भाग्य !

भारतीयांच्या दृष्टीनें वेदविद्येचें महत्त्व अपरंपार आहे. भारतीय जीवनाचा तो मूलभूत पाया आहे. परंतु त्या विद्येंत पूर्ण पारंगत अशीं माणसें किती सांपडतील ? त्या कठीण परंतु अत्यावश्यक विद्येचा सखोल अभ्यास करून पं. सातवळेकर यानीं त्या वेदविद्येचें संशोधन, संकलन, प्रकाशन व प्रचार करण्यांत आपलें सारें दीर्घकालीन आयुष्य घालविलें. भारत पुरुषार्थी व पराक्रमी झाला पाहिजे व त्याचें बीज वेदविद्येंत आहे अशी मनाशीं खूणगांठ बांधून त्यांच्या प्रसारासाठीं आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत पंडितजी मनोभावें झटले व तेंच त्यानीं आपलें जीवनकार्य मानिलें. त्यासाठीं जरूर ती संघटना निर्माण केली व वेदविषयक वाङ्मय सर्वांना उपलब्ध करून दिलें.

पं. सातवळेकर यांचा वेदविषयक व्यासंग दांडगा तसाच असामान्य स्वरूपाचा होता. आजकालच्या देशस्थितीकडे लक्ष देतां भारताचे जर पुनरुत्थान व्हायचें असेल तर तें वेदविद्येची आराधना केल्यानेंच होईल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती व त्या श्रद्धेच्या छायेखालीं ते जीवनभर वावरले.

अगदीं आरंभकाळांत वेदविद्येचें संशोधन करीत असतां त्यांना राष्ट्रीय स्वरूपाचें एक वैदिक गीत आढळून आलें. त्याला अनुलक्षून त्यांनी "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता ' या विषयावर एक अत्यंत जळजळीत लेख लिहिला नि तो त्याकाळीं कोल्हापूर येथून प्रो. विजापूरकर यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या ' विश्ववृत्त ' नामक मासिकाद्वारें प्रसिद्ध केला. त्यांत ते काय म्हणतात पहाः—
" जिच्यामध्यें आमच्या पूर्वजांनीं विशेष पराक्रम केले, जिच्यामध्ये देवांनीं असुरांचा पराभव केला ती आमची मातृभूमि आम्हांला भाग्यशाली करो. ही भूमि माझी माता, मी या मातेचा पुत्र, हे मातृभूमि ! जो आमचा द्वेष करील व आम्हांला दास बनविण्याची इच्छा करील त्याला आमच्या हितासाठी तू नष्ट कर !"

पंडितजींनी एका ऋचेचा केलेला हा सुटसुटीत अनुवाद होता; परंतु तत्कालीन परकीय राजसत्तेला तो मनस्वी झोंबला. आणि त्यापायीं त्या राजसत्तेनें त्यांना गोत्यांत आणून व त्यांच्याविरूद्ध पकड वारंट काढून त्यांना त्राहि भगवान करून सोडलें. पंडितजी हे पूर्वींपासून पूर्णपणें राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्या काळीं काहीं काळ त्यांना मनस्वी मानसिक त्रास भोगावा लागला.

पंडितजींनीं स्वतः वेदपारंगत होऊन वेदांकडे पहाण्याची एक अभिनव नि उन्नतिपोषक दृष्टि भारतीयांस दिली. प्राचीन वेदविद्येचें संशोधन करून त्यांनीं सुमारें साडे चारशेंपेक्षां अधिक लहानमोठे ग्रंथ प्रसिद्ध केले, शिवाय त्या विद्येच्या सार्वत्रिक प्रसारासाठीं त्यानीं 'पुरुषार्थ' (मराठी) नि, "वैदिक-धर्म" (हिंदी) हीं दोन तेजस्वी मासिकें जीवनभर अखंड चालविलीं व तीं आजही जोमानें चालू आहेत.

माणसानें दीर्घकाळ जगून पुरुषार्थ कसा गाजवावा, याचें चालतेंबोलतें प्रतीक म्हणजे पंडित सातवळेकर.

पं. श्री. दा. सातवळेकर यांचा जन्म सावंतवाडीनजीक कोलगांव नामक खेड्यांत १८६६ सालीं झाला. त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण जन्मगावीं व सावंतवाडींत झालें.

सावंतवाडीत त्याकाळीं नारायण शिवराम मालणकर ( मालवणकर नव्हे ) या नावाचे एक चित्रकला शिक्षक चित्रकलेचें शिक्षण देत असत. त्यांचे हात चित्रकलेनें जणू काय भारलेले होते. कलेचा जन्मजात वारसा ते बरोबर घेऊन आले होते. बसल्या बसल्या एखाद्या व्यक्तींचें चित्र ते हुबेहुब रेखाटीत असत. सावंतवाडीच्या युवराजांना ( श्रीमंत बापूसाहेब महाराज ) यांना चित्रकलेचें शिक्षण देण्याचें भाग्य त्याकाळीं त्यांना लाभलें होतें; नुकतेच पंच्याऐशीं वर्षांचे होऊन निधन पावलेले सुविख्यात नि दिगंत कीर्तीचे चित्रकार कै. सा. ल. हळदणकर हे त्यांचे शिष्य व जामात होत.

या अभिजात कलावंताची माहिती फारशी कुठें आलेली आढळली नाहीं. एवढ्यासाठी पं. सातवळेकर यांच्या या थोर कला शिक्षकाचा येथें जातां जातां अल्प परिचय करून देण्यांत येत आहे.

बालवयांत मालणकर–गुरुजींची ती अभिजात कला अवलोकन करून पंडितजी सहाजिकपणें त्यांच्याकडे आकर्षिले गेले व त्यानीं त्यांचें शिष्यत्व पत्करिलें. आपण नामवंत चित्रकार व्हावें ही त्या काळांतील त्यांची महत्त्वाकांक्षा होती आणि प्रयत्नेंकरून ती त्यानीं पूर्ण करून घेतली. ज्या क्षेत्रांत प्रवेश करावयाचा तें क्षेत्र शोभवावयाचें व त्यांत असामान्य यश मिळवून दाखवावयाचें, हा पंडितजींच्या ठायीं एक मोठा दुर्मिळ गुण होता. त्याला अनुसरून घरची गरिबी असतांही ते मुंबईंत आले व त्यानीं तेथील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या कला शिक्षणसंस्थेंत प्रवेश मिळवून तेथें मानसन्मानासह त्यानीं आपला अभ्यासक्रम पूर्ण केला.

तेथील युरोपीयन प्राचार्य एका कलेंत मोठे वाकबगार होते. जो जो हुषार व कलानिपूण विद्यार्थी आढळून येईल, त्याला आपलासा करून घेऊन शिक्षकाच्या नात्याने आपल्या संस्थेशीं निगडीत करून ठेवावयाचें. त्याला अनुसरून तो प्रयोग पंडितजीवरही करण्यांत आला व कलेची अधिक सेवा करतां यावी या हेतूनें पंडितजी शिक्षक या नात्यानें त्या संस्थेंत बर्ष दीडवर्ष राहिलें. पोर्ट्रेड-पेंटिंग मध्यें अर्थात् मानवाकृति हुबेहुब चितारण्यांत त्यांचा प्रथमापासून हातखंडा होता. तें त्यांच्या वाट्यास आलेलें गुरुकृपेचें फळ होतें. या शिक्षणसंस्थेंत शिक्षण घेत असतां नंतरच्या काळांत चित्रकला व चित्रकारांचे आश्रयदाते या व इतर

नात्यांनीं प्रसिद्धीस आलेले औंधचे अधिपति बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे त्यांचे एक सहाध्यायी व सन्मित्र होते. याच मैत्रीचें पर्यवसान नंतरच्या काळांत पंडितजीनीं औंध येथें राजेसाहेबांच्या आश्रमाखालीं जाऊन दीर्घकाळ रहाण्यांत व्हावयाचें होतें.

पंडितजींना कलेच्या दृष्टीनें मुंबईबाहेर कुठें ना कुठें क्षेत्र हवें होतें. आणि विचारांतीं त्यानीं निजामसरकारच्या हैद्राबाद संस्थानांत जाऊन रहाण्याचें ठरविलें. तेथें धनिकांकडून त्यांना उदार आश्रय मिळण्यासारखा होता. त्याप्रमाणें हैद्राबाद येथें त्यानीं आपलें कला–मंदिर उघडलें. अपेक्षेप्रमाणें तेथील धनिक वर्गाकडून भरपूर काम मिळूं लागलें व पैसाहि मिळूं लागला.

मिळणाऱ्या लौकिकावर व पैशांवर पंडितजी राजी नव्हते. ते चळवळ्या स्वभावाचे होते व देशासाठीं आपण कांहीं ना कांहीं केलें पाहिजे असें त्यांना वाटत असे.

हैद्राबाद येथें असतां तेथील आर्यसमाजाशीं त्यांचा निकट संबंध जुळून आला. त्यामुळें त्यांना संस्कृत भाषेच्या अध्ययनाची व वैदिक वाङ्मयाची अतीव गोडी वाटूं लागली. महर्षि दयानंद सरस्वती यांच्या प्रेरणेमुळें आर्यसमाजाकडून वेदविद्येचा प्रचार चालू होता. काय असेल तें असो. पंडितजी त्या कार्याकडे आकर्षिले गेले.

लोकशिक्षणासाठीं हैद्राबादेंत त्यानीं अनेकांच्या सहाय्यानें 'विवेकवर्धिनी सभा' नावाची एक संस्था स्थापन केली व नंतरच्या काळांत ती चांगली नावा-रूपास येऊन तत्कालीन सरकारच्या डोळ्यांत सलूं लागली.

इकडे महाराष्ट्रांत लो. टिळक यानीं स्वराज्यप्राप्तीच्या दृष्टीनें स्वदेशीची चळवळ सुरू केली होती. तिचें आकर्षण वाटून पंडितजीनीं त्या चळवळीचा हैद्राबाद संस्थानांत यशस्वी रीतीनें प्रचार सुरू केला. त्याचा परिणाम म्हणजे स्वदेशी वस्तूंचा खप वाढूं लागला व परदेशी माल पडून राहूं लागला.

हैद्राबादेंत गोऱ्या रेसिडेंटचें वास्तव्य होतें. त्याच्या नजरेंत पंडितजींची स्वदेशी प्रचार चळवळ सलूं लागली तो बेचैन झाला. त्यानें पंडितजीविरुद्ध निजामाचे कान फुंकण्यास सुरुवात केली. निजामानें प्रथम त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं, परंतु सुरत कॉंग्रेसमध्यें पंडित सातवळेकर हे लो. टिळकांच्या बरोबर

होते, असा गवगवा झाला व तो निजामशहाच्या कानावर गेला. तेव्हां मात्र निजाम खवळला.

पं. सातवळेकर यांस गिरफदार केलें जाणार, अशा अफवा सर्वत्र पसरल्या व त्याप्रमाणें घडून येण्यापूर्वींच या राज्यांतून पाय काढणें श्रेयस्कर असें वाटून पंडितजींनीं एके दिवशीं हैद्राबादला रामराम ठोकला नि ते हरिद्वारला गेले.

हरिद्वारला आर्यसमाजाची गुरुकूल ही नावारूपास आलेली व स्वामी श्रद्धानंदजी यानीं चालविलेली महान संस्था होती. त्या संस्थेंत वेद नि चित्रकला हे विषय विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या कामगिरीवर त्यांची नेमणूक झाली. तें कार्य पंडितजींना फार आवडणारें होते.

परंतु तेथेंही ते दीर्घकाळ राहूं शकले नाहींत. वर उल्लेख केल्याप्रमाणें "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता" या मथळ्याखालीं हैद्राबाद येथें असतां त्यानीं जो लेख 'विश्ववृत्त' मासिकासाठीं लिहिला होता, तो इंग्रज अधिकाऱ्यांस सहन न होऊन त्यांच्याविरुद्ध पकड वारंट निघालें.

पंडितजींना ती बातमी समजतांच शिक्षणसंस्थेला आपल्यामुळें त्रास होऊं नये या हेतूनें त्यानीं स्वामी श्रद्धानंदजीचा मोठ्या कष्टानें निरोप घेतला व ते मद्रासकडे वळले. कांहीं काळ त्या प्रांतांतील पिठापूरम् संस्थानांत वास्तव्य करून तेथील महाराजांच्या तसबिरा तयार करून दिल्या व तेथील वास्तव्यांत पांच सहा हजार मिळविले.

तदनंतर आपण होऊन ते सरकारच्या स्वाधीन झाले व कोल्हापूर येथें आले. महाराजानीं त्यांना मानानें वागविलें. त्यांच्यावर खटला भरण्यांत आला; परंतु सुदैवानें ते त्यांतून यशस्वी रीणीनें सुटले. ज्या मॅजिस्ट्रेटपुढें त्यांचा खटला चालला त्याला मात्र आपल्या नोकरीस मुकावें लागलें !

पुन्हा पंजाबांत जाऊन लाहोर येथें त्यांनीं आपलें कार्य सुरू केलें. आतां त्यांचें बहुतेक लक्ष वेदविद्येकडे व तिच्या प्रचाराकडे लागून राहिलें होतें.

पंडितजींचा स्वधर्माभिमान व स्वदेशाभिमान प्रखर स्वरूपाचा होता. औंधच्या राजसिंहासनावर आरूढ झालेले श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या ठायींही ते गुण प्रकर्षानें वास करीत होते. पूर्वींचा ऋणानुबंध होतांच. राजेसाहेबानीं पंडितजींचें कार्य व त्यांचें गुणवैभव लक्षांत घेऊन त्यांना आपल्या संस्थानांत येऊन रहाण्याचें अत्यंत आग्रहपूर्वक आमंत्रण केलें.

भावी कार्याकडे नि काळाकडे लक्ष देऊन पंडितजीनीं तें आमंत्रण स्वीकारलें. ( १९१८ ) तेथें गेल्यापासून पंडितजींच्या कार्याला सुव्यवस्थित स्वरूप येऊं लागलें. दीर्घकाळ म्हणजे सुमारें तीस वर्षें ( १९४८ पर्यंत ) पंडितजी औंधमध्यें होते. त्या काळांत वेदविद्येच्या व्यासंगांत व प्रचारांत ते गुंतून गेले होते, एवढेंच नाहीं, तर संस्थानी प्रजाजीवनाशीं ते एकरूप होऊन गेले होते. तेथें त्यानीं 'स्वाध्याय-मंडळ' या नंतरच्या काळांत फार नांवारूपास आलेल्या संस्थेची स्थापना केली. त्यांनीं त्या कालावधींत बहुतेक सर्व वेदांचें भाषांतर सुलभ भाषेंत तयार करून तें प्रसिद्ध केलें. हा तीस वर्षांचा काळ पंडितजींच्या जीवनांतील अधिक महत्त्वाचा व कार्याचा भार उचलण्याच्या दृष्टीनें बहुमोलाचा मानावा लागेल.

काळ झपाट्यानें बदलत चालला. १९४७ साल उजाडलें. भारत स्वतंत्र झाला. पंडितजींची एक महान् आकांक्षा फळास आली. आणि त्याचबरोबर भारतांतील सारींच संस्थानें नामशेष करण्यांत येऊन तीं जवळपासच्या मुलखास जोडून टाकण्यांत आलीं.

त्यामुळे काय झालें ? पंडितजींना जो राजाश्रय मिळत होता तो संपुष्टांत आला आणि त्यांना औंधचा निरोप घेऊन गुजराथेंत सुरतजवळ पारडी या गावीं स्थलांतर करावें लागलें. ( १९४८ )

आपल्या कार्याचा विस्तृत संसार थाटण्यासाठीं त्यांना जागा व इमारतींची जरूरी होती. ती पारडी गांवानें भागविली.

पंडितजींच्या वास्तव्यामुळें पारडी हें एक पुण्यपावन क्षेत्र बनलें. तेथेंही पंडितजीनीं आपल्या अवाढव्य कार्याचा डोंगर औंधप्रमाणें उभा केला. गेल्या वीस वर्षांपासून पंडितजींचें कार्य पारडी येथील केंद्राकडून चालू आहे व पुढेंही तें पंडितजींच्या मागें दीर्घकाळ चालू राहिल.

चित्रकला आणि आमची प्राचीन वेदविद्या. या दोन्ही विद्या एक-मेकांपासून भिन्न आहेत; परंतु त्या दोन्ही विद्या पंडिजीतशीं हंसत खेळत लीलेनें वावरल्या व त्यांचें जीवन सर्वांगसुंदर बनविण्यास कारणीभूत झाल्या.

पंडितजी पुरुषार्थी होते. प्रत्येक भारतीयानें आपल्याप्रमाणें पुरुषार्थी होऊन जन्मा आलियाचे सार्थक करावें व आपला देह लोककल्याणासाठीं अविरत

झिजवावा असें त्यांना वाटतअसे व त्याप्रमाणे ते जीवनभर वागले. लोककल्याणा-साठी कणाकणानें झिजले.

आपल्या पर्वतप्राय कर्तृत्वाच्या रूपानें त्यांनी आम्हां सर्वांपुढें उच्च आदर्श ठेविला आहे. तो आदर्श आपण आपल्या दृष्टीपुढें सतत ठेवूं या व आपापल्या क्षेत्रांत पुरुषार्थ गाजवून त्यांच्याप्रमाणें अमर होण्याचा मार्ग स्वीकारूं या.

— संपादक

# साईबाबांची सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी

## पालखीचा कार्यक्रम

मुंबईत श्री साईबाबांच्या सुवर्णमहोत्सवी उत्सवास ता. ११ आक्टोबर रोजीं प्रारंभ होणार आहे. त्यानिमित्त शिरडी येथून बाबांच्या पादुका मुंबईंतील उत्सवस्थळीं पालखींतून आणण्यांत यावयाच्या आहेत. त्या संबंधीचा कार्य-क्रम निश्चित झालेला आहे, तो असाः—

या पालखीचा प्रवास ज्या ज्या भागांतून व्हावयाचा आहे, त्या त्या भागांतील बाबांच्या भक्तांनीं शक्य तों जास्तींत जास्त सहकार देण्याची तत्परता आनंदानें व भक्तिभावपूर्वक दर्शविली आहे; त्यामुळे कोठेही विलंब वा खोटी होण्याचा संभव नाहीं.

बाबांच्या पादुकांसह ही पालखी ता. ४ आक्टोबर रोजी पहांटेच्या प्रहरीं शिरडी येथून निघेल. ती नंतर सुमारें बारा मैलांवर असलेल्या पोहेगावीं रात्रींचा मुक्काम करील. मार्गावर त्यानंतर रात्रींचा मुक्काम पुढील ठिकाणी नमूद केलेल्या तारखांस होईल.

वावी (शनिवार ता. ५) खोपडी (रविवार ता. ६) सिन्नर (सोमवार ता. ७) नाशीक रोड (मंगळवार ता. ८) नाशीक (बुधवार ता. ९)

नाशीक येथून पालखी गुरुवार ता. १० आक्टोबर रोजीं सकाळी निघेल. या मार्गावर पालखी थांबवावी लागेल अशीं फारशीं स्थळें नसल्यामुळें व हा भाग टेकडीवजा असल्यामुळे सायनपर्यंतचा प्रवास, जलदगतीनें होईल. सायन हे मुंबापुरीचें महाद्वार असल्यामुळे तेथें होणाऱ्या स्वागत-समारंभासाठीं वेळेवर पोहोंचावयाचें आहे. तरी या मार्गावरील प्रवासांत जागोजागच्या भक्तांच्या विनंतीनुरूप पूर्वयोजनेनुरूप अल्प काळ पालखी थांबविण्याची व्यवस्था करण्यांत येईल. मात्र सायनला वेळेवर पोहोंचावयाचें आहे, याकडे दुर्लक्ष करतां येण्यासारखे नाहीं.

पालखीबरोबर बाबांच्या ज्या भक्तांना रहावयाचें असेल त्यानीं कृपा करून संस्थानावर अवलंबून न राहतां आपापली व्यवस्था लावून घ्यावी, अशी विनंती आहे.

जी भक्तमंडळी मुंबईत येईल त्यांची रहाण्यासवरण्याची व्यवस्था करावी अशी संस्थानची कितीही इच्छा असली तरी इतर जबाबदाऱ्यांमुळें ती जबाबदारी संस्थानाला पत्करतां येण्यासारखी नाहीं. या असमर्थपणाबद्दल कृपा करून भक्तमंडळींनीं क्षमा करावी, अशी विनंती करण्यांत येत आहे.

## उत्सवानिमित्त शिरडीस येणाऱ्या भक्तांस विनंती

साईबाबांचा शिरडी येथें होणारा सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम ता. २३ ते ता. १ आक्टोबरपर्यंत चालणार आहे. त्यावेळीं सर्व भागांतील भक्तमंडळी शिरडी येथें फार मोठ्या प्रमाणांत हजर राहील हें निर्विवाद आहे. शिरडी येथें येणाऱ्या सर्व भक्तमंडळीच्या सुखसोयीसाठीं उत्सवसमिती आपल्या परीनें झटत आहे व झटत राहील; परंतु भक्त मंडळीनीं आपण कधीं येणार व किती दिवस मुक्काम करणार वगरेसंबंधीं माहिती शिरडी येथील उत्सव कमिटीस अगाऊ कळविण्याची कृपा केल्यास उभयपक्षीं सोयीचें होईल, यासाठीं ही विनंती करण्यांत येत आहे. भक्तमंडळीनीं कृपया या विनंतीकडे लक्ष पुरवावें.

# साईबाबा कोण होते ?

लेखकः— डॉ. के. भ. गव्हाणकर

तुळशीमाळा धारण करणारा प्रभु भक्तप्रेमाकरितां सगुण श्रीसाईस्वरूपांत प्रकटला आहे. या देवाचें खरे नांव, त्याची जात, मूळ गांव याविषयीं कोणासही नक्की माहिती नाहीं. त्या सगुण साकार चैतन्य मूर्तीला भक्तश्रेष्ठ म्हाळसापतीं यानीं 'साईबाबा' हें नांव दिले. त्या लीलाधारी साईचे "मशिदींतील वास्तव्य" "अल्ला मालिक" हा त्यांचा नेहमीचा मंत्र आणि 'अल्ला तेरा भला करेगा' हा त्यांचा नेहमीचा आशिर्वाद, इत्यादि गोष्टीवरून बाबा मुसलमान होते असें कोणी समजतील, पण या उलट दुसऱ्या कांहीं गोष्टी आहेत, त्यावरून ते हिंदु होते, इतकेंच नव्हे तर ब्राह्मण संन्यासी होते, असें दिसतें. ठळक ठळक गोष्टी येणेप्रमाणें—

१ ) बाबा आपली तिन्ही वेळची आरती व दुपारची पूजा ब्राह्मणांकडून करवून घेत. त्यांची प्रथम पूजा म्हाळसापतीने, दुसरी निमगांवचे सीतारामजी डेंगळे व तिसरी पूजा नानासाहेब चांदोरकर यांचे धाकटे चिरंजीव महादेव ऊर्फ बापू यांनी केली. तेव्हापासून बाबांची षोडशोपचार पूजा सुरू झाली.
२ ) धुनीरूपानें मशिदींत अग्निनारायण अखंड प्रज्वलित आहे. कोणत्याही मशिदीत असा अग्नी ठेवणे हे मुसलमानी धर्माविरुद्ध आहे.
३ ) बाबा हे कौपिनवंत व कफनी घालणारे होते; त्यांची सुंता झालेली नव्हती. त्यांचे कान टोचलेले होते.
४ ) दिवसांतून पुष्कळ वेळां अनेक रूपांनी "नारायणाचे" नांव घेत असत.
५ ) बाबा संस्कृत पंडित होते, त्यांनी सर्व गीता नानासाहेब चांदोरकरांस संक्षेपरूपानें पण व्याकरण दृष्ट्या शिकविली. ( ह. भ. प. दासगणूकृत संत-लीलामृत अ. ३१.३२ व संतकथामृत अ. ५७ )

## समाधि—निर्णय

सद्गुरु साईबाबानी आपल्या देहाचा अंतिम निर्णय स्वतःच घेऊन भक्तांकरवीं आपली समाधी बांधून घेतली.

एकदां म्हणजे सुमारें १९११-१२ सालांतील गोष्ट. बाबा अत्यंत आजारी पडले व त्या दुखण्यांतून ते निभावतील असें कोणासही वाटलें नाहीं. ह. भ. प. नानासाहेब चांदोरकर यांनी बहुतेक साईभक्तांस ही हकीकत कळवून बाबांचें शेवटचें दर्शन घेण्याकरतां सुचविलें. त्याप्रमाणें पुष्कळ भजनमंडळ्या शिरडीस जमल्या. बाबांना दुखण्यांतून आराम पडून अरिष्ट शांत व्हावे म्हणून प्रत्येकानें रात्रंदिवस आपल्या इच्छेनुरूप अनुष्ठान, वेदानुष्ठान, लघुरुद्र, चंडीपाठ वगैरे करावें असा नानासाहेबांनीच दंडक घालून दिला होता. त्याप्रमाणें कार्यक्रम सुरू झाला. पण बाबांच्या दुखण्यास आराम पडेना. सर्व मंडळी घाबरली व चिंतातुर झाली. एक दिवस असा आला कीं बाबांच्या दुखण्याचा जोर वाढत चालला. व बाबांच्या जीवित्वाचा आशातंतू आतांच तुटतो कीं काय असें क्षणोक्षणीं प्रत्येकास वाटूं लागलें. नानासाहेब, काकासाहेब दीक्षित, बापुसाहेब जोग, बाळासाहेब भाटे, देव ( बाबांचें बाळ ), तात्याबा पाटील कोते वगैरे मंडळींचा विचार ठरला कीं बाबांचे या दुखण्यांत जर कांहीं बरें वाईट झालें तर त्यांचा देह दर्ग्यांत न्यावयाचा किंवा त्यांना वाड्यात समाधि द्यावयाची हें आतांच बाबांच्याकडून निश्चित करून घ्यावें, म्हणजे पुढें हिंदु-मुसलमानांत लढा पडणार नाहीं. पण हें बाबांना विचारणें फारच कठिण व भयंकर आहे. विचारावें कोणी ? तरीपण हें कार्य कोणीतरी व केव्हांतरी केलेंच पाहिजे. करितां हें काम तुम्ही करा, असा नानासाहेबांस वरील सर्व मंडळींचा आग्रह पडला. नानासाहेब म्हणाले "मी तरी हें कसें करूं" ? इतक्यांत द्वारकामाईतून बाबांकडून नानासाहेब कोठें आहेत म्हणून तपास करीत ही सर्व मंडळी बसली होती, त्या दीक्षित वाड्याच्या खोलींत एक इसम आला. तो नानासाहेबांजवळ जाऊन त्यांना म्हणाला, "बाबांनी सांगितलें आहे कीं, आमच्या मरणाच्या चवकशी आत्ताच करूं नका, आम्ही कांहीं आतांच मरत नाहीं. तुमचा चाललेला धंदा तुम्ही करा म्हणजे झालें. आमच्या देहाची विल्हेवाट स्वतःच लावू. आपण सर्व बेफिकीर असा." हें ऐकून त्यांच्या सर्वव्यापकत्वाबद्दल अत्यंत कौतुक वाटलें. मग सर्वांनी पूर्वी ठरविलेल्या मुदतीपर्यंत आपापलीं अनुष्ठानें व अभिषेक वगैरे चालू ठेविलें. शेवटीं नानासाहेबानी आलेल्या मंडळींस शिऱ्याचे भोजन दिलें. बाबांना आराम पडला. भक्तजन आपापल्या घरीं निघून गेले.

बाबांनी आपली पुढील व्यवस्था उघड रीतीनें कांहीं ठरविली नव्हती. फक्त देह सोडण्यापूर्वीं थोडा वेळ त्यांनी "मला वाड्यांत घेऊन चला' असे उद्गार काढले होते. हीच त्यांची शेवटची इच्छा, व एके दिवशीं बाबा लेंडीवर जात असता बुट्टीवाड्याजवळ आल्याबरोबर ( तेव्हा बुट्टीवाड्याचें काम सुरू होते ) " देवा देऊळ बघायला चल " असें माधवराव म्हणाले. तेव्हा बाबा आत ( वाड्यात ) शिरले. व ज्या ठिकाणी हल्ली समाधि आहे त्या ठिकाणी हाताच्या बोटानी आयत् (Rectangle) काढून म्हणाले " अरे शाम्या, हीं जागा लय चांगली, इथेंच आपण येऊन राहूंया, खेळूंया, हसूंया, समद्या पोरासनं येथेंच बोलावूं बरं का शाम्या ! मग इथेंच मुंग्यावाणी रांग लागेल. " माधवरावांना वाटलें कीं ही वेळ बरी आहे, तरी त्वरा करावी, आणि म्हणाले " मग देवा नारळ आणूं का ? " बाबा म्हणाले " आण " त्यानंतर नारळ आणून तो बाबांच्या हस्तें फोडून मुहूर्त केला. व श्री राधाकृष्ण मूर्तीची स्थापना करण्याची जागा मुक्रर केली.

निर्याणापूर्वीं ४।५ दिवस सोनीचे आईस ( अधू माखाड्याच्या बायकोस ) बोलावून बाबानीं सागितलें कीं, आता मला द्वारकामाईचा कंटाळा आला, चावडीचा कंटाळा आला, आता मी वाड्यात जाऊन बसेन, तेथें भटे लोक माझा सांभाळ करतील.

तसेंच बापूसाहेब जोगाच्या ताईला ( बायकोला ) समाधिस्थ होण्यापूर्वीं ४।५ वर्षांपूर्वीं बाबानीं त्यांचा हात धरून आणून सागितलें कीं ही हगदोडीची जागा माझी आहे. इथं दगडी इमारत होईल, तेथें मी बसेन वगैरे बाबाचे संकल्प पूर्वींच ठरलेले होते असें दिसते. परंतु बाबानी कशाचा पत्ता लागूं दिला नाहीं. भक्तांना आतून प्रेरणा करून सर्व काम करून घ्यावयाचें.

बाबानी देह मंगळवार १५ आक्टोबर १९१८ रोजीं तिसरे प्रहरीं ठेविला.

## श्री साईबाबांचें परदेशांतील कार्य

लंडनमधील सुप्रसिद्ध डॉ. क्यानन यांचे घरीं छबीरूपानें वास्तव्य करून ज्या डॉक्टर साहेबांनी लिहिलेल्या 'इन्व्हिजीबल इनफ्लुएन्स' अज्ञान, सामर्थ्य, किंवा प्रेरणा या पुस्तकाच्या वावटळींतून त्यांना वांचविलें ती प्रेरणा बाबांनी इंग्रजी भाषेंतूनच केली. बाबा मराठी व हिंदी बोलतात हें तर सर्वश्रुत आहे. बाबा

एका पठाणाशीं काकासाहेब दीक्षित व माधवराव देशपांडे यांचे समक्ष श्री द्वारकामाईत त्याच्या पुश्तु भाषेंत एकदां बोलत होते असें माधवराव व काका नेहमी सांगत. नानासाहेब चांदोरकराना बाबानी सर्व संस्कृत भगवद्गीता व्याकरणासह शिकविली. तसेंच बाबानी कै. अबदुलभाइ जुवे ( अबदुलबाबा ) याना कुराण ग्रंथ समजावून दिला. यावरून बाबांना ज्ञात व अज्ञात जगातील सर्व भाषा अवगत होत्या. हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें. बाबा सिद्ध, जिवन्मुक्त, महायोगेश्वर व जगदात्मा असल्यामुळे त्यांना सर्व भाषांचे ज्ञान असणे साहजिकच होतें. व त्या त्या भाषेच्या भक्तास ते त्या भाषेंतच बोध करीत असत, हें सत्य आहे.

सुमारे सन १९३४ चे पूर्वी ( किती वर्षे ते समजत नाहीं ) आंग्ल देशाच्या लंडन राजधानीत निवास करणाऱ्या व "अज्ञात सामर्थ्य" या नांवाचें 'इनव्हिजीबल इनफ्लुएन्स' पुस्तक लिहून प्रसिद्ध करणाऱ्या प्रसिद्ध कॉनन नांवाच्या डॉक्टरचे घरीं श्री साईमाउलीचें एक उत्तम छायाचित्र आहे. असें स्वतः डॉ. कॉनन ह्यांनी कै. बाबासाहेब तर्खड त्यावेळी असलेले श्री साईलीलेचें संपादक ह्यांस कळविल्यावरून श्री तर्खड यांनी डॉक्टर साहेबांना 'श्री साईबाबा ऑफ शिरडी' या रावबहादूर मोरेश्वर, वि. प्रधान यांनी इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकाच्या तीन प्रती पाठविल्या. डॉक्टर साहेबांना त्यापैकी एकच प्रत मिळाल्यामुळें त्यांनी आणखी कांहीं प्रतींची बाबासाहेबांकडे मागणी केली. बाबासाहेबांनी लागलीच दहा प्रती डॉक्टरसाहेबांना पाठविल्या.

'इनव्हिजीबल इनफ्लुएन्स' पुस्तक, लंडन काउंटी कौन्सिलला न आवडल्यामुळे त्यांचेवर राग होऊन त्यांनी डॉक्टरसाहेबांना त्यांच्या जागेचा राजीनामा द्यावयास लावला. श्री सद्गुरुमाउलीच्या कृपेने, डॉक्टरसाहेबांनी आपल्या पुस्तकातील मजुकराच्या सत्यतेबद्दल काउंटी कौन्सलरांची खात्री पटवून दिली व काउंटी कौन्सलरनी डॉक्टरसाहेबांस पुन्हां त्यांचे जागेवर रूजू केलें. इतकेच नव्हे पण त्यांना आणखी वरिष्ठ प्रकारची जागा दिली.

( श्री साईलीला वर्षे ११ अंक १ )

# तूं स्वतःस पोरका समजूं नकोस

**—विनोबाजी**

**नको सांडूं अन्न नको सेवूं वन**
**चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥**
**मातेचिये खांदीं बाळ नेणे भीण**
**भावना त्या भिन्न मुंडाविया ॥ २ ॥**
**नको गुंफों भोगीं नको पडों त्यागीं**
**लावुनी सरे अंगीं देवाचिया ॥ ३ ॥**
**तुका म्हणे नको पुसों वेळोवेळां**
**उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ४ ॥**

अन्न सोडूं नको किंवा जंगलहि गाठूं नको. नारायणाचें चिंतन कर, आणि जें जें नशिबाला येईल तें भोगून टाक. आईचा आसरा असतांना बाळाला कसला बागुलबोवा ? आपण अलग पडलों आहोंत ही भावनाच खोडून टाकली पाहिजे. भोगात गुंतू नको आणि त्यागाच्याहि भरीस पडूं नको; सगळें गाठोडें देवाच्या खुंटीवर टांगून मोकळा हो कसा ! तुकाराम महाराज म्हणतात, आता पुन्हा काहीं पुसूं नको. माझ्यापाशीं दुसरा उपदेश करायचा काहीं उरला नाहीं.

तुकाराम महाराजांच्या साधुत्वाची ख्याति चहूंकडे पसरली, तेव्हां पुष्कळ लोक त्यांच्यापाशीं उपदेश मागण्यासाठीं येऊं लागले. त्या सर्वांना ह्या अभंगांत एक कायमचा उपदेश सांगून टाकला आहे.

(१) बाहेरून त्याग करण्याच्या भरीस पडूं नको. तसें करण्यांत भोग येऊन चिकटतात. वरून वरून इंद्रियें आवरलीं म्हणजे मनानें विषयांचें अधिकच स्मरण होऊं लागतें. ह्यालाच भगवंतांनीं 'मिथ्याचार' म्हटलें आहे—

**कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥**—गीता

**त्यागें भोग माझ्या येतील अंतरा ।**
**मग मी दातारा काय करूं ॥** —तुकाराम

(२) म्हणून कर्तव्य-भावनेनें प्राप्त भोग भोगून टाक. पण गुंतू नकोस. अनासक्त रहा.

**यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।**
**कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥**—गीता

अर्थ—मनानें इंद्रियें आवरून अनासक्त वृत्तीनें कर्मयोगाचें आचरण करीत रहावें हेंच विशेष आहे.

(३) त्याग आणि भोग ह्यांची ही गुंतागुंत देवावर सोंपवून दे, म्हणजे तूं सुटलास. त्याग आणि भोग ह्यांची पक्की निरगांठ बसली आहे :

(अ) आसक्त पुरुषानें बाह्यात्कारीं त्याग केला तरी तो भोगाचा भोग होऊन बसतो. उलट.विरक्त पुरुष वाहेरून विषयांत वागत असला तरी तो भोग म्हणजे ‘ त्यागांचा त्याग ’ ठरतो.

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान् मनुष्येषु......** ॥—गीता

अर्थ—कर्मांत अकर्म आणि अकर्मांत कर्म पाहतां येणें हें बुद्धिमान् पुरुषाचें लक्षण आहे.

**भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥**
**ऐसें उरफाटें वर्म । धर्मा अंगीं च अधर्म ॥**—तुकाराम

(आ) आसक्त पुरुष वरून वरून मोठा भोग भोगत आहे असें दिसलें तरी त्यच्या मनांत आनंदाचा लेशहि नसतो. म्हणजे तो आपल्या ‘ भोगाचा त्याग ’ करून बसला असेंच होतें. उलट विरक्त पुरुषानें बाह्यात्कारीं त्याग केला असें दिसत असलें तरी आंत आनंदाच्या लाटा उसळत असतात. म्हणून त्यानें आपल्या ‘ त्यागाचा भोग ’ बनविला असें ठरतें.

**त्यज धर्ममधर्मं च उभे सत्यानृते त्यज ।**
**उभे सत्यानृते त्यक्त्वा येन त्यजसि तत् त्यज ॥**—महाभारत

अर्थ—धर्म सोड, अधर्म सोड, ब्रह्म सोड, जग सोड आणि ज्याच्या योगानें हें सर्व सोडशील तेंहि सर्व सोडच !

अशी ही सोडचिठ्ठीची भानगड आहे. ती सारी देवावर सोंपवून मोकळा हो.

**चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥**—तुकाराम

(४) देव मेला नाहीं. तुझ्या पाठीशीं उभा आहे. मी एकटा पडलो आहें; आईबाप मरून पोरका झालों आहें, अशा अनाथ भावनेनें बावरल्यासारखें रान धरूं नकोस.

**'हरीचिया दासा नाहीं भय चिंता ।'** —तुकाराम
**'भवाच्या भयें काय भीतोसि लंडी ।'**—समर्थ

'परिव्राजक' म्हणजे सैरावैरा धांवत सुटणारा असा अर्थ नाहीं. ईश्वराला शरण जाणारा तो 'परिव्राजक' असा अर्थ गीतेनें सांगितला आहे—

**सर्वधर्मान् "परि" त्यज्य मामेकं शरणं "व्रज" ।**

"परि" म्हणजे "परित्यज्य" —सर्व भानगड सोडून, "व्राजक" म्हणजे एका ईश्वराला शरण गेलेला, तो "परिव्राजक" हा अर्थ ध्यानांत ठेवत जा आतां.

**तुका म्हणे पुसों नको वेळोवेळां ।**
**उपदेश वेगळा उरला नाहीं ॥**

**एतदेवाहं ब्रह्म वेद, नातः परमस्तीति ।** —प्रश्नोपनिषत्

अर्थ—एवढेंच ब्रह्म मला समजतें. ह्याहून अधिक कांहीं नाहीं.

**एतावदरे खलु अमृतत्वमिति ।** बृहदारण्यक

अर्थ—मोक्षसाधन एवढेंच.

---

# शिरडीचे श्री साईबाबा

लेखक– **ल. म. रणदिवे**

'शिरडीचे साईबाबा' या शब्दोच्चारानें बहुतेकाचीं अंतःकरणें भक्तीनें व प्रेमानें भरून जातात व मस्तकें विनम्र होतात. अशी काय जादू या गोड नावात आहे बरें ? केवळ भारतांतच नव्हे तर इतर देशांतही बाबाचें नाम भक्तिभावानें घेतलें जातें अशी वस्तुस्थिति आहे. ठिकठिकाणीं बाबाचीं मंदिरें बांधलीं जात आहेत. घरोघरीं त्यांच्या गोड नामाचे सप्ताह साजरे केले जात आहेत. घरोघरीं त्याच्या सच्चरिताचीं पारायणें होत आहेत. कांहीं ठिकाणीं निरनिराळ्या संस्था स्थापन करण्यांत येऊन अखंड वीणावादनांत त्यांचे मधुर नांव गायिलें जात आहे. पुष्कळसे भक्तजन शिरडी येथें जाऊन त्यांच्या समाधीवर मस्तकें ठेवतात

व आपलीं दुःखें त्यांना सांगून त्यांचा कृपाप्रसाद मिळविण्यासाठीं त्यांची प्रार्थना करतात. श्रीसाईबाबांनीं समाधी घेऊन आतां पन्नास वर्षें व्हावयास आलीं. परंतु दिवसेदिवस त्यांच्यावरील भक्तींत व श्रद्धेंत वृद्धीच होत चालली आहे. हजारो भक्तजन श्रीबाबांच्या समाधीचें दर्शन घेण्यासाठीं आतुर झालेले असतात. कांहीं भक्तजन श्रीबाबांना परमेश्वराचा अवतार म्हणतात तर कांहीं त्यांना संतश्रेष्ठ या पदवीला पोहोंचवितात.

अशा तऱ्हेनें सर्वांचीं अंतःकरणें आकर्षित करणारे व त्यांच्या अंतःकरणांत श्रीसाईबाबाबद्दल भक्तिप्रेम निर्माण करणारे श्री बाबांचें जीवन काय आहे याचा आपण थोडक्यांत विचार करूं.

श्रीसाईबाबांच्या जन्माबद्दल कोणीही छातीठोकपणें निश्चित माहिती देऊं शकत नाहीं. एवढे मात्र निश्चितपणें समजतें कीं १६ वर्षें वयाची ही तेजस्वी व सौंदर्यसंपन्न बालमूर्ति एके दिवशीं शिरडींत अवतरली. बहुतेक सर्व संतमहंतांना या जुलमी जगाचा जाच सहन करावा लागला आहे. त्याला श्रीसाईबाबाही अपवाद नव्हते. पण आपल्या देहाची कुरवंडी करून जगाच्या कल्याणासाठींच ज्यांचा अवतार असतो त्यांना दैहिक हालअपेष्टांची कांहींच पर्वा नसते. मानापमान, निंदास्तुति, सुखदुःख वगैरे गोष्टी त्यांच्या जीवनध्येयाच्या आड येत नाहींत. नामस्मरणाचा दिव्य संदेश गरीब व अज्ञानी माणसांच्या झोपडीपर्यन्त पोहोंचविणे हेंच त्यांचे जीवनकार्य होतें. ‘ चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं ’ अशी एक म्हण प्रचलित आहे. पण नमस्कार घेण्यासाठीं बाबांनीं चमत्कार केले नाहींत तर संताच्या हातून चमत्कार सहाजिकपणेंच घडतात व त्यांत त्यांचा हेतु जनकल्याणच असतें. बहुजनसमाज व संत यांच्याआड अहंभावाची भिंत असते, लोभी दुकानदारांच्या या आड येणाऱ्या लोभरूपी भींतीचें उच्चाटन करण्यासाठीं बाबांनीं सुरवातीसच पणत्यांचा चमत्कार दाखविला. अशा आपल्या स्वतःच्या आयुष्यांत बहुजन समाजाला सन्मार्गावर आणण्यासाठीं त्यांनीं अगणित चमत्कार दाखविले आहेत. पण केवळ चमत्कारामुळेंच त्यांना हें श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे असे नसून त्यांचे जीवनकार्य दुःखितांचें दुःख हरण करणें, रोग्यांच्या रोगांचे निर्मूलन करणें, नामस्मरण व भक्तिमार्गांकडे जनतेची प्रवृत्ति करणें, हिंदु मुसलमानांमध्ये ऐक्य व प्रेमभाव निर्माण करणे, रंजल्यागांजलेल्यांना दिलासा देणे

वगैरे गोष्टींनीं प्रकाशित झाले आहे. धीर व सबुरी हे दोनच पैसे त्यांनीं लोकां-जवळ मागितले आहेत. कोणतेही अंगिकारलेले कार्य यशस्वी होण्यास या दोन गुणांची किती आवश्यकता आहे हे सांगणें नलगे. वेदांताची जिवंत शिकवण सांन्निध्यांत आलेल्या लोकांना त्यांनीं दिली आहे. सर्व गोष्टी परमेश्वराच्या हातीं असतात. मानवप्राणी केवळ निमित्तमात्र असतो हें भगवद्गीतेतील गुह्य त्यांनीं आपल्या आचरणाने लोकांस पटविलें आहे. आपल्या सुमधुर वाणीनें लाखों लोकांची जीवने बाबांनीं आनंदमय केलीं आहेत आणि शांति व भक्तिसुखामृताच्या स्वादाचा लाभ त्यांना त्यांनीं दिला आहे व म्हणूनच श्रीबाबांचें गोड नांव आज बहुतेकांच्या मुखीं आहे.

या ठिकाणीं हें सांगावयाचें आहे कीं वाचकांपैकीं बहुतेकांना ते परमेश्वरी अवतार आहेत याची अनुभवानें साक्ष पटली असेल. प्रत्येकानें त्या बाबतचे अनुभव निरनिराळे असतील. जग हे सुखदुःखानें भरलेलें आहे. प्रत्येक मानवास सुखदुःखाचे प्रसंग येतातच. कठीणप्रसंगीं श्री बाबांना हाक मारल्या-नंतर ती मायाळू आई आपल्या हाकेला धांवून येते याचे अनुभव प्रत्येकास आले असतील. प्रस्तुत लेखकासही अशा प्रसंगी श्री साईबाबांचा कृपाप्रसाद मिळाल्याचे अनुभव आहेत. ते येथें सांगणे लेखकास प्रस्तुत वाटत नाहीं. पण लेखक छातीठोकपणें इतके म्हणूं शकतो कीं श्री बाबांच्यावर श्रद्धा ठेवा. त्यांचे नामस्मरण करा, त्यांचे रूप आठवा आणि मग गंमत पहा कीं ती कनवाळू माऊली तुमच्या हाकेला धावते कीं नाहीं तें.

या लहानशा लेखांत श्रीबाबांच्या जीवनकार्याची महती सांगता येणें अशक्य आहे. लौकरच बाबांच्या समाधीचा सुवर्ण महोत्सव साजरा होणार आहे. तरी बाबांवर नितांत श्रद्धा ठेवून या महोत्सवामध्ये प्रत्येकाने भाग घ्यावा व भक्तिने व प्रेमाने बाबांची आराधना करून त्यांनी आपणा सर्वत्राना त्याचे गोड नाम घेण्याची बुद्धि द्यावी हीच एकमेव प्रार्थना.

# संत नामदेव व योगिनी मीरा

## ( उत्तरार्ध )

अनुवादकः— गणेश विष्णु कत्रिटकर, एम्. ए.

ईश्वराठायीं असणारा नेमका हाच भाव याच भाषेंत रविदास व मीराबाई यांनीं कसा मांडला आहे पहा.—

**रविदास—**

तुमन तोरहु तउ हम नहीं तोरहि
तुम सिउ तोर कवन सिउ जोरहि
जउ तुम गिरिवर तउ हम मोरा,
जउ तुम चंद तउ हम भये है चकोरा
जउ तुम दीवरा तउ हम बाती,
जउ तुम तीरथ तउ हम जाती,
साची प्रीति हम तुम सिउ जोरी,
तुम सिउ जोरी अवर संगि तोरी
जह जह जाउ तहा तेरी सेवा,
तुम सो ठाकुर अउरु न देवा
तुमरे भजन कट हि जाय फाँसा,
भगति हेत गावै रविदासा

( ग्रं. सा. राग—सोरट )

'तुम्हीं मला सोडलें नाहीं तर मी तुम्हाला कसा सोडीन ? तुम्हाला सोडून कोणाबरोबर जोडला जाऊं ? जर तुम्ही गिरिवर असाल तर मी मोर आहें, तुम्ही जर दीपशिखा असाल तर मी वात आहें, तुम्ही तीर्थ असाल तर मी यात्री आहें. माझें खरें प्रेम तुमच्यावर जडलें आहे. तुमच्या बरोबर संबंध जोडला गेल्यामुळें माझीं सर्व बंधनें तुटून गेलीं आहेत. जेथें जातों तेथें तुझी सेवा

करतों. तुमच्या सारखा ठाकूर व देव कोण असूं शकेल? तुमच्या भजनानें यमाचे पाश तुटतात. तुमच्या प्रेमभक्तीचीं गायनें रविदास गातो आहे.

मीराबाई—

साँचि प्रीति हम तुम सिउ जोरी,
तुम सिउ जोरी अवर सँगि तोरी।
जहँ जहँ जाउँ तहाँ तोरी सेवा,
तुम सो ठाकुर अउरु न देवा॥
(श्री गुरुग्रंथ साहबजी, पृ० ६५७)

नामदेवांच्या वरील पदांतील 'जहाँ तुम दिवा तहां मैं बाती' हे काव्य-चरण 'हरिबिन जिवडा यूँ जलै रे, ज्यूँ दीपक संग बाती' या मीराबाईच्या उक्तींत उमटलें आहे.

जगनश्वरता सांगतांना नामदेवराय म्हणतात—

नहीं ऐसो जन्म बारम्बार।
को पूरब जन्म को सुकृत कीनियो
मानस लियो अवतार।
बढत पल पल घटत छिन छिन
जात लगत न बार।
रत्न जन्म अमोलिक पायो
जीत भावे हार।
साच शब्द का बांध बेडा
उरत भवनिधि पार।
जैसे बन, फुल टूट हैं।
बहड न लगते डार।

नामदेव की नई पदावली, पृ० ४७,४८.

हा मानव जन्म वारंवार प्राप्त होणार नाहीं. पूर्व जन्मींचें कांहीं सुकृत होतें म्हणून हा मानव देह मिळाला. त्याला पळापळानें वाढत आणि क्षणाक्षणानें झिजत नष्ट होण्यास कांहींच वेळ लागणार नाहीं. मानव जन्म अमूल्य रत्ना-प्रमाणें प्राप्त झाला आहे. वास्तविक तो जय झाला आहे पण पराभव भासत

आहे --- म्हणून परमेश्वर नामाचा तराफा तयार कर आणि हा भवसागर उतरून पार हो. ज्याप्रमाणें वनांत तुटून पडलेल्या फुलाला झाडाच्या फांदीवर पुनः बहार येत नाहीं.

नामदेवांच्या या विचारांचाच नव्हे तर शब्दांचा आणि दृष्टान्ताचाहि मागोवा मीराबाईनें घेतला आहे—पाहा :—

“नही ऐसी जनम बार बार ॥ टेक ॥
का जानूँ कुछ पुण्य प्रगटे; मानुसा अवतार ।
बढत छिन छिन घटत पल पल, जात न लागे बार ।
बिरछके जूँ पात टूटे बहुरि न लागे डार ।
भौसागर अति जोर कहिये अनंत उंडी धार ।
रामनाम का बाँध बेडा, उतर परले पार
ज्ञान चोसर मँडी चोहटे, सुरत पासा सार ।
या दुनियाँ में रची बाजी, जीत भावै हार ।

## नामनिष्ठा

रामनाम हे चिरंतन धन असून सद्‌गुरूनें या अमूल्य धनाची प्राप्ति कशी करून घ्यावी हें दाखवून दिलें असें नामदेव म्हणतात. ज्या काव्यचरणांत नामदेवांनीं हें सांगितलें आहे--त्या काव्यपंक्तींतील शब्दांतच त्यांतील रूपक-दृष्टान्तासहित मीराबाईनीं आपला अनुभव निवेदन केला आहे. पहाः—

नामदेवः—

पायो राम रतन धन भाई ज कबहूँ न लागै काई ।
नाम जहाज भक्ती खेवढूआ मैं सागर तर आई ।
गुरुप्रसादि साधु को संगति । भाग बडे ते पाई ।
अगन न दाझै कीडा न लागै धर्ति धरयो न जाई ।
खावत खरचत तोटि न आवै, सतिगुरु कला बताऊ ।
छाडि गुपाल अवर जे जाचौ नामदेऊ राम दुलाऊ ।

(ना. न. प. पा. ५१)

हे बंधो ! जें कधींहि मलिन होत नाहीं अगर गंजून जात नाहीं अशा रामरूपी रत्न धनाची प्राप्ति करून घे. नामरूपी जहाज भक्तिरूपी नावाडी यांच्या सहाय्यानें मी भवसागर तरून आलों आहें. सद्गुरुकृपा आणि संत-संगति हीं मोठ्या भाग्यानें प्राप्त झालीं. या धनाला अग्नि जाळूं शकत नाहीं, कीड लागत नाहीं. जमीन त्याला पोटांत घेत नाहीं. तें धन खाल्ल्यानें अगर खर्च केल्यानें कमी होत नाहीं. सद्गुरूनें अशा धनाची प्राप्ति कशी करून घ्यावी ही कला दाखवून दिलेली आहे. नामदेव म्हणतात–प्रभु गोपालाला सोडून तूं दुसऱ्या कोणाचाहि शोध घेशील तर तुला परमेश्वराची आण आहे.

अमोलिक वस्तु म्हणजे मंत्र–चैतन्य नाम सद्गुरूनें दिल्याचें रहस मीराबाईनीं प्रकाशिलें आहेः—

**मैंने राम रतन धन पायो ॥ टेक ॥**
**बसत अमोलिक दी मेरे सतगुरु, करि किरपा अपणायौ ।**
**जनम जनम की पूँजी पाई, जग में सबै खोवायो ।**
**खरचै नहि कोई चोर न लेवे; दिन दिन बधत सवायो ।**
**सत की नाव खेवटिया सतगुरु, भवसागर तरि आयो ।**
**मीराँ के प्रभु गिरिधर नागर, हरखि हरखि जस गायो**

**मीराबाई की पदावली पृ. २५७**

## मीराबाई संतमत

मीराबाईच्या रचनेंत भक्त नामदेव, कबीरसाहेब, रविदास यांच्या प्रमाणें ‘ पिंडरहस्या ’ चा उलगडा केल्याचेंहि आढळून येतें. मीराबाईंच्या शब्दावलींत ब्रह्मरंध्राचे ठिकाणीं ध्यान लावून समाधिस्थ झालें असतां परमानंद अनुभवतां येतो असें म्हटलें आहे. ( त्रिकुटी महल में बना है झरोखा, तहांसे झांकी लगाऊं, री । सुन्नमहल में सुरत जमाऊं, सुख की सेज बिछाऊं री । ) सुषुम्ना वा ब्रह्मनाडीच्या सहाय्यानें साधना करीत सहजसमाधींत परमात्मलीन झाल्यानंतरचें वर्णन शृंगारसज्जित नायिका आणि तिचा प्रियतम यांच्या मीलनाच्या रूपकद्वारा मीराबाईनें केला आहे ( सेज सुखमणा मीराँ सोहै ). तसेंच ( ‘ गँगन मंडल पै सेझ पिका की, किसविध मिलणा होई. )’ गगनमंडलांत प्रियतमाची शय्या आहे.

त्याची कोणत्याप्रकारें भेट होईल ? असेंहि तिनें आर्ततेनें म्हटलें आहे. कांहीं पदांत अपरोक्षानुभूतीच्या या अवस्थेंत म्हणजे जीवात्मा व परमात्मा जेव्हां अभेदरूप एकाकार होतात, त्या अवस्थेस मीराबाईनें 'अगम अटारी ' 'अगमका देस ' वा 'अमरलोक ' अशीं नांवें दिलीं आहेत. परमात्म्याशीं तादात्म्य होऊन त्या अवस्थेंत प्रभावित झाल्यानें तिनें करतलाशिवाय पखवाज वाजतो किंवा 'अणहद की झंकार' कर्णपथावर पडतो असा आपला अनुभव कथन केला आहे.

नामदेवांचा निजानुभवहि हाच होता.

**अणमडिया मंदलु बाजै ।**
**बिनसावन घनहरु गाजै ॥**

( कातड्यानें मढविल्याशिवाय बुद्धिरूपी मृदंग वाजत आहे. श्रावण महिना नसतांहि मेघ गर्जना करीत आहे इत्यादि. )

अशाप्रकारें मीराबाईना संतांच्या प्रसिद्ध 'सुरतशब्दयोगांचाहि ' परिचय होता, आणि त्यासंबंधीं चर्चा करतांना तिनें 'सुरत निरत ', 'सबद ', 'निजनाम ', 'सुमिरत ', व 'अमररस ' या शब्दांचा प्रयोगहि केला आहे.

याशिवाय, मीराबाईनीं संतमतानुसार अत्यंत आवश्यक असलेल्या शुद्धाचरणाचा 'सील बरत 'चा पुरस्कार केला आणि कांहीं पदांतून प्रसारहि केला आहे.

संतमताचे आद्य प्रणेते संत नामदेव होते. त्यांच्या पश्चात् कबीरदासांनीं या संतमताचा पुरस्कार करून उत्तर भारतांत नवें चैतन्य निर्माण केलें. त्यांच्या कार्यानें सारा उत्तरभारत उफाळून, ढवळून निघाला होता आणि हीच परंपरा भक्तिकालाच्या उत्तरार्धांत पुढें योगिनी मीराबाईनीं चालविली.

# मनांत आलं कीं—

( ले. द. शं. टिपणीस )

( फेब्रुवारी ६८ च्या अंकावरून पुढें चालू )

## जंगली जनावरांचा आश्रम

एकंदरींत जग विचित्रच ! हेच पहाना, आफ्रिकेंत हिंस्र पशूंचा एक अनाथाश्रम आहे. जंगलांतील वाघ सिंहादी वन्य पशूंचीं पोरकी पिलें आणून त्यांचें पालन पोषण त्या आश्रमांत केलें जातें. जंगलांतील भावी जीवनास लायक झाल्यावर त्यांना परत जंगलांत सोडून देण्यांत येते. आहे कीं नाहीं भूतदयेचा नमुना ! साधुसंतांचीच दया म्हणावयाची ही. जंगल शोधून पोरक्या बच्च्यांना आणायचें, त्यांचें बाटली अन्नावर ( bottle feeding ) पोषण करावयाचें, भावी जंगली आयुष्यास जरूर त्या सर्व गोष्टींत त्यांना तरबेज करावयाचें व तसें ते झाल्यावर त्यांना गुलाम म्हणून न ठेवतां त्यांचें स्वातंत्र्य त्यांना बहाल करायचें व जंगलांत सोडून द्यायचें. असें आहे या आश्रमाचें कार्य. मानवी मनाचा केवढा हा उदारपणा ! पण विचित्र गोष्ट अशी कीं वन्यपशूंच्या बच्च्यांच्या बाबींत मानव जें करतो तें स्वतांच्या बच्च्यांच्या बाबतींत करीत नाहीं. तपासून पहा. आपण मुलांबाळांचें पोषण कसें करतो तें. पहा कीं आपल्या-शिक्षण पद्धतींत काय आहे. Bottle feeding दुसरें काय ? कृत्रिम अन्न. मानसशास्त्र सांगतें कीं मुलांच्या कलानें नैसर्गिक गोष्टीस अनुसरून शिक्षण द्यावें. पण हें काटेकोर कोठें पाळतात तर आफ्रिकेंतील वन्यपशूंच्या आश्रमांत. खरोखर तेथली शिक्षण-पद्धति आतां आम्ही स्वीकारावी. कारण भारतीय शिक्षणतज्ञ आतां थकले आहेत. विचित्र वाटते हें; पण करणार काय ? मानवच विचित्रपणा व्यवहारांत करतो आहे. वन्यपशूंच्या बाबतींतील भूतदया व उदारपणा आम्ही आमच्या मुलाबाळांच्या बाबतींत दाखवीत नाहीं.

## विज्ञानानें कमाल केली

एका इंग्रज कवीनें म्हटले आहे कीं दिवस काम करण्यासाठीं व रात्र विश्रांतीसाठीं देवानें निर्माण केली आहेत. आज तरी हें खरें नाहीं. देवाची इच्छा

लाख असेल, पण आज विज्ञानानें सर्वच उलटापालट करून टाकले आहे. दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस हल्लीं करावा लागतो. पूर्वीप्रमाणें दिवसा सूर्य मावळण्यापूर्वीं जेवायचे, अंधार पडला कीं झोंपावयाचे व भल्या पहाटे उठावयाचें हें आतां राहिलें नाहीं. This makes a man healthy wealthy and wise असें असलें तरी आज तें व्यवहार्य नाहीं. विज्ञान व आळस यामुळें आम्हाला रात्रीचा दिवस करावा लागतो. दिवस करणें हा कांहीं सूर्याचा मक्ता राहिला नाहीं. माणूसही आतां तो करू शकतो. विज्ञानामुळें रात्रीचा दिवस करता येतो व काम करता येते. आळसही रात्रीचा दिवस करून काम पूर्ण करायला भाग पाडतो. रात्र करण्यांत निसर्गाचा उद्देश विश्रांति मिळावी हा आहे. रात्री झाडांची पानें कशी गळून गेलेली असतात. झोपी गेलेली असतात. दिवसभर काम केल्यावर शरीराला विश्रांती पाहिजे. झोप ही विश्रांती आहे. कवीनें सांगितलेला नियम आज जर कोणी थोडाफार पाळीत असतील तर तीं दुकानें होत. दुकानाचें रिपेरिंग वर्क, रंग, सजावट, वगैरे रात्रीं चालते कारण दिवसा काम चालत. मानवी शरीराचें असेंच आहे. दिवसा काम व रात्री झोप. गाढ झोपेंतच शरीराचें रिपेरिंग वर्कशॉप चालू असतें. जीवनानें दिवसभर केलेल्या प्रवासाच्या धकाधकींत झालेली मोडतोड यावेळी दुरुस्त केली जाते. म्हणून गाढ झोप हें उत्तम प्रकृतीचें गुपित आहे. निसर्गाविरुद्ध गेल्यानें शरीरावर वाईट परिणाम होणारच. विज्ञानामुळें कित्येक वेळां आपल्याला निसर्गाविरुद्ध जावें लागते. परिणामीं आपली प्रकृती खालावते. याला उपाय शरीराच्या अंतर्गत यंत्रणेवर ताबा मिळविणें हा होय. यासाठीं अध्यात्म पाहिजे. विज्ञानानें उत्पन्न होणारे दोष अध्यात्म घालवूं शकेल. विज्ञानाच्या खांद्यावर अध्यात्म बसून दोघांनीं सहकार्यानें वाटचाल केली तर खरी प्रगती पदरांत पडेल.

## सरोवर व महासागर

विज्ञाना (science) ची तपस्या करणें म्हणजे एका मोठ्या तलावांत पोहण्यासारखे आहे. आत्मज्ञानाची तपस्या करणें म्हणजे महासागरांत पोहणें होय. मोठ्या कां होईना पण सरोवरांत पोहणारा तितक्याच कौशल्यानें महासागरांत पोहूं शकेल असें नाहीं. पण महासागरांत पोहणारा सरोवरांत सहज पोहूं शकेल. सरोवरांतील लाटा व महासागरांतील लाटा यांत महदंतर आहे. विज्ञानाच्या तपस्येत जो कोणी संकटें व अडचणी तरून गेला तो आत्मज्ञानाच्या

तपस्येतील संकटें व अडचणी तरून जाईल याची खात्री नाहीं. म्हणून सरोवरांत पोहणाऱ्यांनीं आपण पट्टीचें पोहणारे आहोंत असा अभिमान धरूं नये. महासागरांतील पोहणें म्हणून कांहीं तरी एक निराळे आहे, हें ध्यानांत ठेवावे. दोहोंतही पाणी (ज्ञान) असलें तरी सरोवर व महासागर यांच्या पोटांत विस्मय जनक फरक आहे. सरोवराच्या तळाचा अंत लावतां येईल पण महासागराच्या तळाचा थांगपत्ता कोणाला लागला आहे ? सरोवरांत बुडी मारली तर फार तर मासे हाताला लागतील. महासागरांत बुडी मारली तर मोतीं हातीं येतील.. असें असलें तरी सरोवरांत पोहणें जरूर आहे, कारण महासागरांत पोहण्याची (Stepping stone) म्हणून सरोवराचा उपयोग आहे. ब्रह्मज्ञानाचा मार्ग विज्ञानाच्या बोगद्यांतून जात नसेल कशावरून ?

## विद्याज्ञानाचें पुण्य

एका मराठी कवीनें म्हटलें आहे कीं विद्या दिल्यानें कमी होत नाहीं तर उलट वाढते. खरें आहे. दुहेरी फायदा आहे त्यांत. जो देतो त्याच्या विद्येची वाढ होते व जो घेतो त्याच्या ठिकाणीं ती निर्माण होऊन वाढीस लागते. यामुळें विद्या व कला चिरंजीव होतात. एक काळ असा होता कीं आपल्या जवळची विद्या वा कला दुसऱ्याला देण्यांत फार लोक कंजुष असत. यामुळें त्या व्यक्तीबरोबर त्याची विद्या व कलाही नामशेष होत असे. परंतु ज्यांनीं आपल्याजवळील विद्या दुसऱ्यास दिली त्यांची विद्या चिरंजीव तर झालीच, शिवाय समाजाचें, राष्ट्राचें व जगाचें कल्याणही झाले. पैसा बँकेंत ठेवल्यानें वाढीस लागत असेल पण विद्या नुसती डोक्यांत ठेवल्यानें वाढत नाहीं तर वापरल्यानें वाढते. असें आहे म्हणून विद्यादानासारखें पुण्य नाहीं.

## अमृतानुभव

ज्यानें अमृताची गोडी अनुभवली त्याला साखरेंत काय गोडी वाटणार ? सर्व गोड पदार्थ त्याला कडूच वाटणार. अमृताखेरीज त्याच्या जिभेला दुसऱ्या कशाचीही गोडी खपणार नाहीं. ज्यानें एकदा आत्मानंदाचें सुख अनुभवले त्याला विषय सुखाचें काय होय ? त्याला तें कडू व विषासारखें वाटतें, त्या अमृतासाठीं आमच्या संतांनी जिवाची कुरवंडी केली. अमृतानुभव मिळावा म्हणून त्यांनीं जीवाचें रान केलें, तो मिळाल्यावर सर्व ऐहिक सुखे काल्र्या-

प्रमाणें कडू वाटू लागली तर नवल नाहीं, म्हणून तर तुकारामानें शिवाजीनें पाठविलेला नजराणा नाकारला व रामदासानीं राज्य परत केलें. दुसरा कोणी असता. तर अनायासें चालून आलेल्या राजसिंहासनावर आनंदाने बसला असता. चालून आलेला पैसा व राज्य नाकारणें आपल्या दृष्टीनें वेडेपणाचें असेल; पण त्यांच्या दृष्टीला तेंच खरें शहाणपण होतें. अमृत चाखलेल्या त्या संतांच्या प्रकृतीला संपत्ती व राजवैभव यांचा कडू वास मानवणारा नव्हता. मानवी देहांत ज्यांनी तें अमृत चाखलें ते धन्य झाले. त्याचा एक घुटका तरी मिळावा म्हणून ईश्वराची भक्ति व आराधना करावयाची असते.

## शरीर हें आत्म्याचें मंदिर

A stich in time saves nine सोन्याचा मोलाचा हा नियम. वेळेवर टाका घातला तर बोटभरचे वीतभर होणार नाही. ठिणगी विझविली तर धास्ती नाहीं. लहानसा दोष वेळींच काढून टाकला तर पुढें होणारी यातायात व नुकसान टळतें. थोडीशी कडकी औषधोपचारानें वेळींच काढून टाकली तर पुढें होणारे भयंकर रोग टळतील. नाहींतर थोडीशी कडकी, काय लक्ष द्यायचें, पाहू, करू उद्यां काय करायचें तें. असें म्हणून दुर्लक्ष करीत राहिलें, ताप अंगात मुरला तर गोष्टी भलत्याच थरावर जातात हा अनुभव आहेच. वडाचें झाड मुळासकट उपटणें महाकठीण व यातायातीचें आहे पण तेंच लहानसें रोपटे असतांना उपटून फेकून देणें ही लीला आहे. शरिराचें असेंच आहे. काहीं थोडेसे झालें तर वेळींच त्याची वासलात लावणें उत्तम. शरीर वस्त्रासारखे आहे. वेळींच शिवलें तर टिकतें, नाहीं तर हातोहात हाताबाहेर जातें. शरीराची वेळींच डागडुजी केली तर ठीक नाहींतर hopless case म्हणून चिठी लागते. यास्तव प्रत्येकाने आपल्या प्रकृतीस जपावें व वेळींच काळजी घ्यावी. शरीर हें आत्म्याचें मंदीर आहे व तें निदान ७०–८० वर्षें तरी टिकलें पाहिजे पण प्रकृति एकसारखी बिघडत राहिली तर आत्मा काय करणार ? तो दुसरा बंगला शोधणार. मोडक्या तोडक्या घरांत कोण राहील ? A stich in time चा मारक tomorrow आहे. यास्तव त्याला थारा देऊ नये.

## आई आणि देव

देव आईसारखा व आई देवासारखी असें म्हणतात. पण नक्की काय ? कोण कोणासारखा आहे, देवाचे गुण आईंत आहेत कीं आईचे गुण देवांत

आहेत ? आरशासमोर उभे राहिल्यास आरशांतले आपण व बाहेरचे आपण सारखेच. पण कोण कोणासारखा ? वास्तविक दोघेही एकच. पण निराळे दिसतात म्हणून प्रश्न पडतो. देव काय, आई काय, मुळांत एकच. आई म्हणजे आदिमाता. शिवाचीच शक्ति ती. शिवशक्ति दोन वाटतात. पण एकच. सूर्य व त्याची प्रभा होत. शब्द वापरतो पण दोन्ही एकच अग्नि व उष्णता एकमेकां-पासून भिन्न नाहींत. तसेंच देव व आई. देव भक्तावर प्रेम करतो. आई आपल्या मुलावर प्रेम करते. भक्ताचें भले पाहून देवाला आनंद होतो. आईलाही मुलाचे भले झालेले पाहून ब्रह्मानंद होतो. भक्तासाठी देव आपलें देवपण सोडून त्याची वाटेल ती सेवा करायला तयार असतो. तर आई आपलें आईपण ( वडिलकीचा मान ) बाजूला ठेवून मुलासाठीं वाटेल त्या खस्ता खायला तयार असते. आईची माया देवाजवळ आहे. म्हणून देवाला माउली म्हणतात व माउली देवासारखी वंद्य मानतात.

## नामस्मरणाचें महत्त्व

केरकचरा वा घाण याची विल्हेवाट आपण कशी लावतों ? एकतर आपण अशा गोष्टी जाळून टाकतो नाहींतर पुरून टाकतो किंवा सुधारलेला प्रकार म्हणजे खड्ड्यांत टाकतों व जोडीला खत होण्यास उपयुक्त असें काहीं टाकतों. व खड्डा बुजवून टाकतो. यापैकीं तिसरा मार्ग उत्तम. त्यांत दुहेरी फायदा आहे. एकतर समाजाला घाणीचा उपद्रव होत नाहीं. व दुसरे असें कीं त्यांतून चांगलें खत निर्माण होऊन तें समाजाच्या वा व्यक्तिच्या कारणीं लागतें. संन्यास वा कडक वैराग्याच्या योगे आपल्या वासना विकार व भावना जाळून टाकण्या-पेक्षां किंवा संयमानें त्या कायमच्या दडपून टाकण्यापेक्षां त्या अध्यात्माच्या सुर्शीत ओतून त्यांत नामस्मरण व भक्ति मिसळली तर अधिक फायदेशीर होईल. त्यांतील घाण नाहींशी होऊन उत्तम खताप्रमाणें मानवाच्या दोन्ही आध्यात्मिक व ऐहिक प्रगतीस अत्यंत उपयोगी होतील. वासना, विकार व भावना यांच्या खताखेरीज मानवी प्रगती होणार नाहीं. म्हणून त्यातील विघातक घाण नाहीशी करून विधायक तेवढे ठेवणें जरूर आहे.

पेटलेल्या अग्नीत लाकूड टाकले तर तें हळू हळू पेट घेते, जळू लागतें व अग्नींत मिसळून जातें. आपल्या विषयवासना नामस्मरणाच्या अग्नींत टाकल्या तर हळू हळू त्यांतील घाण पेटून जळून जाऊन आपलें चित्त शुद्ध

होईल.व मग तें सहज ब्रह्ममय होऊं शकेल. म्हणून चित्तांत नामस्मरणाचा अग्नि सतत पेटत ठेवला पाहिजे.

## मेल्या म्हशीला घडाभर दूध !

मानव हा प्राणी एकंदरीत विचित्रच. त्याच्या वागण्याला कांहीं वेळां धरबंधच नसतो. हेंच पहाना. जन्मला कीं हसतात व मग जन्मभर एकमेकांना हसतात व असें वागतात कीं एकमेकांना रडवतात. सजीवापेक्षां निर्जीवास अधिक मान देण्याची माणसास भारी हौस. दगडाला देवाचा मान देतील पण माणसाला काडीचाही मान देणार नाहींत. मेलेल्या म्हशीला पांच शेर दूध अधिक ही त्याची रीत. जीवंतपणीं माणसाला मान मिळत नाहीं. पण मरणोत्तर भरपूर मान मिळतो ! जीवंतपणीं माणसाला दुसऱ्यांत गुण दिसत नाहींत. दिसतात ते दोषच. पण मेल्यावर दोष कोठे जातात कोण जाणे पण दिसतात ते सर्व गुणच. नसतील तेही दिसतात. जीवंतपणीं ज्याला शिव्या वाहण्यांत जन्म घालविला तोच मेला कीं त्याचे सद्गुण आठवून आठवून गळा काढतात. जीवंतपणीं गळे कापतात व मेल्यावर गळा काढतात. आहे कीं नाहीं विचित्र ? मेल्यावर अपमान करूं नये हा नियम जो तो पवित्रपणें व कसोशीने पाळतो. पण जीवंतपणीं अपमान, उपहास, निंदानालस्ती करण्याची लहानशीही संधी दवडीत नाही. मेल्यावर गुण तेवढे आठवावेत. हें चांगले. दोष आठवून उपयोग काय ? असें म्हणतात. खरें आहे. मग हाच नियम जीवंत माणसास कां लागू करू नये ? कदाचित असें तर नसेल ना कीं मेल्यावर त्याच्याशीं हेवे दावे करून काहींच उपयोग नसतो पण त्याच्या जीवंतपणीं हे उद्योग केले तर जीवनांत खुमारी येते, चव येते, मजा येते व यामुळे एक प्रकारचा जो आनंद मिळतो तो मिळविण्याचा धूर्त कावा तर या या मागे नसेल ना ? किंवा हा सर्व देखावा ढोंगीपणाचा तर नसेल ना ? कांहीं असो; धूर्तता असो नाहीं तर ढोंग असो, पण हें आहे तोपर्यंत मानव हा मानवतेपासून दूरच राहील.

## आत्मतेजाचें एकत्व

जगांत लक्षावधी घरें असतील. त्यांच्या भिंतींची संख्या होईल कोट्यावधी. या कोटी कोटी भिंती ज्याच्या झाल्या ती माती सिमेंट अगर वीटा एकच. नाना भिंती एकच माती. पण निरनिराळे आकार व रंगरंगोटी धारण केली गेल्यामुळें ही कोटी कोटी घरे एकमेकांपासून निराळी भासतात. एकासारखे दुसरें क्वचितच दिसतें. मानवासकट पशुपक्षादि सजीव सृष्टी व दगडधोंड्यादी

निर्जीव सृष्टी यांना चालना देणारे आत्मतेज एकच. पण कर्मामुळें निरनिराळे आकार व वृत्ति आल्यामुळें आत्मतेजाचें एकत्व आपणांस दिसत नाहीं. व आपण हे कोटी कोटी जीव निराळे आहेत असें समजतो. वास्तविक नाना मणी पण एकच सूत्र अशी आहे ब्रह्मांडाची माला. जगाचें सूत्रधार असें जें सूत्र सगळीकडे एकच एक आहे हें कोठें आपणांस दिसतें ? तें दिसावें म्हणून भक्ती करावयाची.

## धोंडा आणि माती

कोणीतरी म्हणाला स्त्री धोंड आहे. त्यावर फुकटची धुमश्चक्री माजली. त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पण तो जें म्हणाला तें मात्र खरें अहे. स्त्री धोंडे आहेत पण पुरुष माती आहे. धोंड्यांतून फत्तरांतून पाणी झिरपतें. त्यामुळें जीवाची धारणा होते. पाणी मातींत मिसळलें तर नाना प्रकारचें घट निर्माण होतात. बोलणाऱ्याच्या मनांत कांहींही असले तरी तो जें बोलला त्यांत स्त्रीचेंच महत्व सिद्ध होतें. नुसती भुसभुशीत माती काय कामाला येईल ? पाणी पाहिजे त्यासाठीं फत्तर पाहिजे. माती व पाणी यांच्या सहकार्यानें नाना प्रकारचीं कार्यें दृश्यरूप धारण करतील. स्त्री धोंड असेल तर पुरुष चाक आहे. मार्गावरून चालूं नये म्हणून त्याला अटकाव करायला धोंडाच लागतो. यांत धोंड्याचाच गौरव आहे नाहीं तर काय ?

## सोनें आणि दागिने

सोन्याचे आपण दागिने करतों. पण सोंने कांहीं दागिन्याबरोबर जन्मास येत नाहीं कीं वेळ प्रसंगीं दागिने मोडल्यावर तें नाहींसें होत नाहीं. सोन्याचें असणें पण दागिन्यावर अवलंबून नाहीं. मूळ ब्रह्म या विश्वाबरोबर जन्मास येत नाहीं कीं विश्व नाश पावलें म्हणजे तें नाश पावेल असें नाहीं. ब्रह्माचें असणें पण विश्वावर अवलंबून नाहीं. विश्वाचें अस्तित्व मात्र ब्रह्मावर अवलंबून आहे. सोन्याच्या निरनिराळ्या आकाराला दागिने हें नाव आहे. ब्रह्माच्या नाना रूपाला आपण निरनिराळी नांवें देतों व सर्व मिळून जें होतें त्याला विश्व म्हणतो. दागिन्यांतून सोने निराळें करता येत नाहीं तसें या विश्वातून ब्रह्म निराळे काढून दाखविता येत नाहीं. जगांतील सर्व दागिन्यांच्या सोनेपणांत फरक नाहीं. तें सर्व दृष्टीला नाना नामरूपे दिसली म्हणून कांही मूळब्रह्मांत फरक नाहीं. ते सर्वत्र एकजिनशीच आहे. फरक वाटतो तो दृष्टिभ्रम आहे.

## सद्गुरूचें महत्त्व

माणसें झोपतात. पण त्यांना तरी किती तऱ्हा ? कांही अगदीं गाढ झोपतात अगदीं मेल्यासारखीं, कशाची कांहीं शुद्ध नसते. त्यांना हालहालवून जागें करावें लागतें. कित्येक उचल जागे असतात. जराशा स्पर्शानें जागे होतात. कित्येक झोपेंत स्वप्नरंजनांत इतके दंग असतात कीं जागे केल्यावर क्षणैक स्वप्नांतील गोष्टी बडबडत राहतात. कांहीं स्वप्नांत ओरडतात, बडबडतात, इतक्या मोठ्यानें कीं ते जागे असलेल्या माणसांना ऐकूं येते. ठरलेल्या वेळेला आपणहून जागे होणारे थोडे. बहुतेकांना जागे करावें लागते, झोपेंमध्यें आपण झोपलों आहोंत हें कळत नाहीं. जागे झालयावर त्याची जाण येते. जो जागा आहे तोच झोपलेल्याना जागा करूं शकेल. असे जागते जगाला अत्यंत जरूर आहेत. कारण जग झोपलें आहे. अज्ञान निद्रेच्या मायेच्या कुशींत घोरत आहे. मानव झोपेंतील स्वप्नात वावरतोय. तेंच त्याला खरें वाटतें. त्यातच तो आपले व्यवहार तन्मयतेनें करीत असतो. जीवन हें एक दिवास्वप्न आहे. पण त्याची जाणीव नाहीं मानवाला. गाढ निद्रेनें घेरलें आहे त्याला. त्याला कोणी जागे करा रे ! म्हणजे कळेल त्याला कीं आपण स्वप्नात वावरत होतो. उगाच वेड्यासारखे त्यात गुरफुटून कटकटी निर्माण करून घेतल्या. पण तो जागा होईल तेव्हा ना ? कोण करणार त्याला जागा. सद्गुरु तेच त्याला देहात्मभावनेच्या स्वप्नातून जागे करूं शकतील.स्वप्नांत कोणी भीतीनें ओरडला तर जागा असेल तो धावत जाऊन त्याला जागा करतो व त्याची भीती घालवितो. तसेंचहें जागले.भक्ताची आर्त हाक ऐकली कीं धावत येऊन त्याला जागा करतात, त्याच्यावर कृपा करून त्याचें भय घालवतात.

## माणसाची लालसा

एक बेडूक आपली लांब जीभ काढून माशीच्या मागें लागला. त्याने माशीला पकडली, व तो ती गिळण्याच्या बेतांत होता. तेवढ्यात एका सर्पानें त्या बेडकाला पकडले, व तो तो बेडूक गिळूं लागला. बेडूक बहाद्दर. अर्धा गिळला तरी त्यानें माशीला तेवढ्यात गट्ट करण्याचें सोडलें नाहीं. ऐहिक सुखोपभोग दिसले कीं माणूस त्यावर बेडकाप्रमाणें टुणकन् उडी मारून ते लालसेच्या लांब जिभेनें पकडून गिळण्याचा भोगण्याचा प्रयत्न करतो. या नादांत तो इतका असतो कीं आपल्या मागें एक काळसर्प-मृत्यू आपल्याला गिळायला टपला आहे हें त्याच्या ध्यानींच येत नाहीं. मृत्यूनें अर्धा गिळला—गलित गात्र झाला तरी लालसेची लांब जीभ काढून सुखोपभोगाच्या मागे तो लागलेलाच असतो. मग सांगा कीं अशा माणसात व बेडकात काय फरक आहे?

ग्रंथ–परिचय—

# परलोक विद्या

**लेखक—नरहर खंडेराव क्षीरसागर; प्रकाशक—व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या ३८१ क, शनिवार पेठ, पुणें २; मूल्य दहा रुपये.**

या ग्रंथाचे लेखक श्री. न. खं. क्षीरसागर हे एक यांत्रिक–यंत्रसंशोधक आहेत. परलोकविद्या, मृताशी संभाषण साधणें हा त्यांच्या जीवनाचा एक हव्यास आहे. गेलीं तीन, साडेतीन तपें या विषयावर त्यानीं सतत संशोधन चालविलें आहे. यंत्रकला असो किंवा कोणतीही गोष्ट असो; तिच्या बुडाशीं जाऊन त्यांत रहस्य कोणतें आहे, हें शोधून पहावयाचें, या हव्यासांतून त्यांच्या या परलोक-विद्या ग्रंथाची निर्मिती झालेली आहे.

परलोकविद्या हें शास्त्र गूढ व गहन असलें तरी त्याचें संशोधन व अभ्यास होणें मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें श्री. क्षीरसागर यांस अत्यावश्यक वाटतें. दिवंगतांचें मार्गदर्शन विद्यमान लोकांस होणें ही किती महत्त्वाची गोष्ट आहे बरें ? तें होऊं लागलें तर आणखी काय पाहिजे ? त्या मार्गदर्शनामुळें माणसाला दिलासा मिळून त्यांना जगांत किंवा संसारांत वावरतांना पदोपदीं ज्या ठेंचा खाव्या लागतात त्या अर्थातच टळतील, असा लेखकाचा विश्वास आहे. त्याचप्रमाणें परदेशीय शास्त्रज्ञांप्रमाणें, या शास्त्राकडे आमच्या संशोधकांचें लक्ष वेधावें व त्यानीं या शास्त्राचा सखोल अभ्यास करावा व यासंबंधींच्या ज्ञानांत अधिकाधिक भर घालावी व त्यासाठीं जरूर ती प्रेरणा मिळावी, या हेतूनें अनेक सन्मित्रांच्या आग्रहावरून त्यानीं हा ग्रंथ पुणें येथील व्हीनस प्रकाशनचे गुणग्राही चालक श्री. सदाशीवराव पाध्ये यांच्या सहकारानें प्रकाशांत आणिला आहे.

तुम्हीं एखादें कार्य जिद्दीनें पार पाडण्यासाठीं बाहेर पडलां म्हणजे समानशील व समान ध्येयाचीं माणसें तुमच्यासमोर येऊं लागतात व त्यांच्या

सहकाराचा लाभ ईशकृपेनें तुम्हांला होऊं शकतो. श्री. क्षीरसागर यांना या कार्यांत असतां तसा लाभ वेळोवेळीं झालेला दिसतो. त्यांत माध्यम या दृष्टीनें त्यांना जो बहुमोलाचा नि हुकमी सहकार मिळाला तो त्यांच्या धर्मपत्नीचा.

या सुमारें तिनशें पानी ग्रंथांत श्री. क्षीरसागर यानीं परलोकविद्या या विषयाचा षरोपरीनें विचार केला आहे. तो विचार करीत असतां त्यानीं या विद्येच्या प्रयोगास आपण सुरुवात कशी केली, माध्यम होणें म्हणजे काय, माध्यम होण्यासाठीं कोणत्या गोष्टीची आवश्यकता असते, परलोक आत्म्याकडून संदेश कसे मिळवावयाचे, ते येतात का ? कीं हा एक खेळ आहे ? परलोक आत्म्याचे फोटो कसे घेण्यांत आले ? (या ग्रंथांत असे अनेक स्पष्ट वा अस्पष्ट फोटो प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.) वगैरे परलोकविद्येच्या कक्षेंत येणारी माहिती या ग्रंथांत करून देण्यांत आली आहे.

या ग्रंथाच्या वाचनानें संशोधक श्री. क्षीरसागर यांची परलोकविद्ये-संबंधींची विचारसरणी समजून घेण्यासारखी आहे. तिचें स्वरूप एकंदरींत असें आहे.—

जीवमात्राला जन्माप्रमाणेंच मृत्यु अटळ आहे याची जाणीव असली तरी मृत्यु म्हणजे कांहीं तरी भयंकर व त्या नंतर काय याचें पूर्ण अज्ञान यामुळें मनुष्यमात्र त्याचे विचारापासून भीतिनें दूर राहून प्राप्त जन्माचें सुख भोगूं द्या मग व्हायचें असेल तें होवो अशा विचारानें मृत्यूचा विचारच टाळीत असतो. परंतु तो विचार केव्हांतरी आल्याशिवाय व अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाहीं. म्हणून विचारवंतानी त्याचा पिच्छा पुरविला व त्यांचे संशोधन आपल्या अज्ञ बांधवांच्या मार्गदर्शनार्थ प्रकाशित केलें. तें असें कीं, कालांतरानें हा देह जीर्ण होऊन अकार्यक्षम झाला कीं तो नष्ट होऊन पंचत्वांत विलीन होतो पण त्याला धारण करणारे चैतन्य जे विश्वांत पूर्ण भरलें असून तें ज्ञानमय, सत्य व अनादी असून त्याचाच अंश जीव म्हणून प्रत्येक शरीरांत वास्तव्य करीत असतो व अंतीं आपल्या कर्मानुसार व वासनांनुसार दुसरे जन्म घेण्यासाठीं पृथ्वीव्यतिरिक्त असलेल्या सूक्ष्मलोकांत सूक्ष्मदेहानें कांहीं कालक्रमणा करून पुन्हां अनुकूल देह धारण करतो व जन्ममरणाचें हें रहाटगाडगे चालूच राहतें. हा शोध विज्ञानानें घेतां येणें शक्य नसल्यानें आपल्या ऋषीमुनींनीं मनाची एकाग्रता करून सूक्ष्म दृष्टी संपादन करून हें विश्वचक्र न्याहाळून सर्वांना उपलब्ध करून अनुभव

घेऊन स्वतः खात्री करून घेण्यास आव्हान केलें. पण सामान्य माणूस देहेंद्रियांचे सुखांत इतका मग्न होतो कीं, असलें कष्टकर संशोधन करण्यास त्याचें मन घेत नाहीं. व तो आपलें जीवन प्रवाहपतिताप्रमाणें अज्ञानांतच व्यतीत करीत असतो. प्राणीमात्राचे व विशेषतः मानवाचे जीवनांत सुखदुःखाची एवढी गर्दी आहे कीं शेवटीं नको तें जीवन असें होऊन जातें. हा अनुभव प्रत्येकास आहे. तेव्हां विचारी मनुष्य यांतून सुटका कशी होईल याचा फार आस्थेनें विचार करतो व म्हणून साधुसंतांनीं सुचविलेलें ईश्वरपूजन, नामस्मरण, सदाचार, परोपकार, अहिंसा आदी मार्गांचा अवलंब करतो. हें करीत असला तरी संसारांतील गरजांसाठीं पडणारे कष्ट, अपुरी प्राप्ती, आजार मुलाबाळांच्या जबाबदाऱ्या यांनीं मनुष्य हैराण होतो व याचे निवारणार्थ काय करावें सुचत नाहीं. शिवाय आपल्या जाणून केलेल्या ईश्वरसेवेची व इतर तपःश्चर्येची फलश्रुती काय व तिची खात्री काय याबद्दल तो साशंकच असतो. व त्याला आपल्या मृत्यूनंतरच्या अवस्थेबद्दल भीतीयुक्त जिज्ञासा तीव्रतर होत जाते. पण त्याला समाधानकारक खात्रीलायक माहिती कोठेंच उपलब्ध नसल्यानें जीवनांत अस्वस्थता जाणवते.

ती शक्य तों दूर करण्याच्या दृष्टीनें हें पुस्तक सहाय्यक व्हावें अशी लेखकाची मनापासून इच्छा आहे. आणि त्यासाठीं प्रत्येक जिज्ञासूनें हें पुस्तक जरूर वाचावें.

मृत्यूनंतर काय होतें ? हें जाणून घेण्याची प्रत्येकास उत्कंठा असणें स्वाभाविक आहे. या जगाचा निरोप घेतल्यानंतर आपण कोठें जातों ? आपल्या कार्याचें फळ आपणास मिळतें का ? भूत, पिशाच्च वगैरे योनी आहेत का ? असल्यास त्याचे मानवाशीं संबंध कोणते ? दिवंगत पुरुष पुन्हां देहधारण करून स्वप्नांत अगर प्रत्यक्ष दर्शन देतात का ? वगैरे प्रश्नांचीं उत्तरें या ग्रंथांत साधार देण्यात आलीं आहेत.

या विषयावर गेल्या पन्नास वर्षांपासून पाश्चात्य देशांतील संशोधक संशोधन करीत आहेत व आपले निष्कर्ष वेळोवेळीं जाहिर करीत आहेत. या शास्त्राला त्यानीं ' स्पिरिच्युआलिझम् ' हें नांव दिलें आहे आमच्या ऋषीमुनींनीही भक्तिज्ञानानें समाधिस्थितीत जाऊन मोलाचें मार्गदर्शन केलें आहे, यासंबंधीचीही माहिती लेखकानें या ग्रथांच्याद्वारें वाचकांपुढें ठेविली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणें हा ग्रंथ म्हणजे लेखक श्री. क्षीरसागर यांच्या गेलीं चाळीस वर्षें निष्ठापूर्वक केलेल्या संशोधन कार्यांचें फळ आहे. जिज्ञासूंनीं हा ग्रंथ वाचून त्यांच्या दीर्घकालीन संशोधनाचा फायदा घ्यावा अशीच कोणीही अपेक्षा करील.

परलोकविद्येबद्दल आमच्या देशांतील लोकांत परस्परविरोधी मतें आढळून येतात. आणि तीं आढळून आलीं तर त्यांत नवल नाहीं; परंतु या विषयाबद्दल ज्यांना जिज्ञासा वाटते त्यानीं याविषयाचें स्वरूप तरी काय आहे व लेखकानें तो विषय कशारितीनें हाताळला आहे हें पहायला व समजून घ्यायला हरकत नसावी, असें वाटतें. —पी. बी. के.

---

# श्रीगुरु पौर्णिमा उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणी श्री साईबाबामहाराज यांचा श्री गुरुपौर्णिमा उत्सव सालाबादप्रमाणे यंदाही आषाढ शु. १४ मंगळवार दिनांक ९ जुलै १९६८ पासून आषढ वद्य गुरुवार दिनांक ११ जुलै १९६८ पर्यंत तीन दिवस शिरडी येथें श्री साईबाबासंस्थानातर्फे सादर करण्यांत आला. मुख्य दिवस आषाढ शु. १५ शके १८९० दिनांक १०।७।६८ बुधवार होता.

उत्सवाचा कार्यक्रम अगोदर मे. माननीय कोर्ट रिसीव्हर श्री. डी. डी. पाटणकरसाहेब यांनी खाते-प्रमुखांची सभा घेऊन ठरविल्याप्रमाणें दिनांक ९ मंगळवार रोजी नित्यकार्य-क्रमाव्यतिरिक्त पहाटे ६ वाजतां श्रींचे फोटोंची व पोथीची मिरवणूक मंदिरांतून निघून गुरुपादुकामार्गे श्रींचे द्वारकामाईत भव्य चांदीचे सिंहासनांत उत्सवमूर्तिची स्थापना व अखंड अध्याय वाचनास प्रारंभ. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान, भक्तांची अभिषेकपूजा, श्रींच्या वस्त्रांची प्रसाद म्हणून विक्री, माध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद. सायंकाळीं ४॥ ते ६॥ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे कीर्तन रात्रौ ९ ते ११ पर्यंत. श्रींचे पालखीची मिरवणूक गारुड भारुड भजन, दिंडी, लेजिम, सुरसनई, चौघडा ब्यांडवादनासह. त्यानंतर शेजारती. दिनांक १० बुधवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुपादुकामार्गे श्रींचे समाधीमंदीरांत आणि

त्यानंतर श्रींचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रार्पण, पुष्पार्पण. नंतर भक्तांचे अभिषेक पूजा वगैरे व वस्त्रांची प्रसाद म्हणून विक्री. माध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद सायंकाळी ४॥ ते ६॥ पर्यंत संस्थानगवई विठ्ठलराव मराठे यांचे गुरुसद्गुरु व गुरुभक्ती या विषयावर सुश्राव्य कीर्तन. रात्रौ श्रींचे रथाची गावांतून मिरवणूक वाजंत्री, चौघडा, लेजिम, भजनी दिंडी गारुड, भारुड वगैरेसह. त्यानंतर रात्रभर जागरण. भक्तांना दर्शनासाठी मंदीर रात्रभर खुलें व कलाकारांच्या हजेऱ्या. कलाकारांत साकोरी येथील पंडित जगन्नाथ बुवा सुरतकर यांचे २॥ तास शास्त्रीय संगीत गायन झालें. त्यानंतर श्री. श्रीपादराव साठे पुणें यांनी गीतरामायणांतील कांहीं पदें गाइलीं. श्री. बाबुराव सोनावणे कोपरगाव व रघुनाथ बाबुराव सांडभोर पुणे, यांच्या गारुड नकलांचा कार्यक्रम झाला. त्यानंतर श्री. वसंत बाबुराव देवळणकर पुणें, श्रीं. नाथोबा जाधव पुणें, श्री. शंकरराव तुपे पुणें, श्री दामुअण्णा दळवी श्रीरामपूर, श्री. दत्तात्रय राऊत नगर यांचे सनईवादन झालें. श्री. राजाराम देशपांडे पुणें यांचे हार्मोनियमवादन झालें. श्री. साठे पुणें व श्री. गुरुदत्त साकोरी श्री. शंकरराव सालकर बेट कोपरगाव यांचें तबलावादन झालें. याप्रमाणें पहाटे ६ वाजेपर्यंत कार्यक्रम झाला. शेवटीं श्री. दत्तात्रय दामोदर (नानासाहेब) रासने पुणें यांचें भैरवीरागांतील भजन होऊन हा कलाकरांचा कार्यक्रम समाप्त झाला. दिनांक ११ गुरुवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे मंगलस्नान; भक्तांच्या सामुदायिक अभिषेक पूजा व श्रींचे कापडाची गुरुप्रसादरूपानें विक्री, नंतर १०॥ ते १२ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचें गोपाळकालाकीर्तन; दहीहंडी, माध्यान्हआरती, तीर्थप्रसाद होऊन कार्यक्रम समाप्त झाला. उत्सवाकरितां मुद्दाम मांडव, कमानी, ध्वजपताका दीपोत्सव रोषणाई करण्यांत आली होती.

या वर्षी बाहेरगावच्या भक्तांची गर्दी थोडी कमी प्रमाणांत होती. तसेंच भक्तांना राहण्याच्या जागा अगोदर ठरल्याप्रमाणें डी. डी. टी. नें फवारे मारून सॅनिटेशन खात्यामार्फत स्वच्छ करून ठेवण्यात आल्या होत्या. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था औषध वगैरे टाकून चांगली केली होती. तसेंच तीन दिवस भोजनगृहामार्फत भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत पक्वान्नप्रसादाची व्यवस्था ठेवण्यांत आली होती. तीन दिवस संस्थान नोकर, सेवेकरी वगैरेंना अल्पोपहार (चहा चिवडा लाडू) फराळ देण्यांत आला. गुरुपौर्णिमा उत्सव समाप्त. ता. १२।७।६८

# परोपकारासाठीं अवतार

लेखक—द. दे. आंबेकर, गंगाखेड

घनदाट अरण्यांत सृष्टीसौंदर्याने संपन्न असलेल्या स्थानीं ईश चिंतनांत निमग्न राहून परमोच्च आनंदाचा आस्वाद घेण्याची भारतीय परंपरा आजही दृष्टीस पडते. त्याचे प्रत्यंतर निसर्गसौंदर्याने परिपूर्ण असलेल्या डोंगरमाथ्याचे ठिकाणीं हेमाडपंती म्हणून संबोधल्या जाणाऱ्या प्रेक्षणीय देवालयांची तेथील अलौकिक सृष्टि सौंदर्ययुक्त नयनमनोहर देखावा पाहून माणूस मंत्रमुग्ध होतो. तेथील शांत वातावरणांत मन आनंदून जाते. अशा निसर्गरम्य ठिकाणीं अनेक संतमहात्म्यांचे वास्तव्य झालेलें आढळतें. परंतु हिन्दु न मुसलमान; पारसी न ख्रिस्ती भेदाभेद न ठेवतां मानवी समुदायात गजबजलेल्या वातावरणात ज्याच्या ठिकाणीं अष्टसिद्धी वास करते, ज्याने वासनेवर विजय संपादन केला आहे मोक्षसुखाच्या परमोच्च आनंदापर्यंत पोहचलेला आहे असा एक फकीर डोक्यावर एक फडके, आणि अंगावर फाटका डगला ठेवून मोक्षसुखाच्या परमोच्च आनंदालाही दूर सारून सर्वसंग परित्याग करून दुःखिताची आर्त हांक ऐकून मानवी कळपांत ज्याने आपले आसन स्थिर केलें आहे; त्या महापुरुषाच्या वास्तव्याने पुनीत झालेले स्थान अजरामर न झालें तरच नवल! देहाचें अस्तित्व संपल्यानंतरही अर्धशतकापासून मानवी कल्याणासाठी मार्गदर्शन करणारा अखंड दीप त्याचे पुण्याईने पावन झालेल्या स्थानीं अखंड तेवत ठेवला आहे. सामान्यांतल्या सामान्य सद्भावनेने प्रेरित झालेल्या माणसालाही हा महापुरुष ईश्वरीबंदा म्हणून मार्गदर्शन करतो. दुःखिताची आर्त हांक ऐकून धावून येतो. दीनदुबळ्यांचा कैवारी, गरीब व श्रीमंत हा भेदाभेद न मानतां दलीत पतितांचा उद्धार करणारा, मानव जातीचे कल्याण करणारा, परमेश्वरी साक्षात्काराचें दर्शन घडवणारा अशा या फकीराची स्तुतिसुमने गात गात महाराष्ट्रांतील प्रख्यातमहासंत ‘दास गणू’ सारखे थोर पुरुषही नतमस्तक होतात तीच ही महान विभूती म्हणजे शिरडीचे ‘**साईबाबा**’

## संतकवि दासगणू महाराज यांच्या आठवणी पाठवा

आधुनिक महिपति संतकवि श्रीदासगणू महाराज यांचें समग्र वाङ्मय पुरवणी खंड धरून दहा भागांत प्रसिद्ध झालें आहे. आतां त्यांचें चरित्र व काव्यविवेचन या ग्रंथाचें लिखाण चालू आहे. हा ग्रंथ सामान्यतः पाचशें ते साडे पाचशें पृष्ठांचा होईल. महाराष्ट्रांत वा बाहेरही महाराजाचें भक्त, चहाते पुष्कळ आहेत. महाराजांचा लोकसंग्रह मोठा होता.

म्हणून विनंती कीं, कोणाजवळ त्यांचा विशेष असा पत्रव्यवहार, दुर्मिळ छायाचित्रे वा त्यांनी लिहिलेलें काव्य यापैकी जे जे असेल तें त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावें. महाराजांच्या संबंधीच्या आठवणीही लिहून पाठवाव्यात. पाठविलेल्या साहित्याची चांगली जपणूक केली जाईल व काम झाल्यानंतर. तें साहित्य कृतज्ञतापूर्वक परत केलें जाईल.

पत्ताः— श्री. अनंतराव दामोदर आठवले,
७४३, सदाशिवपेठ, पुणे २.

पुढील अंक—

### सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी विशेषांक

साईलीलेचा पुढील अंक सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी विशेषांक म्हणून ता. १ आक्टोबर १९६८ रोजीं प्रसिद्ध होईल. हा विशेषांक नेहमींच्या अंकापेक्षां अनेक पटीनें मोठा सचित्र व त्यांत नामवंत विद्वानांचे श्रीसाईबाबा विषयक, अध्यात्मिक व संत कार्यविषयक असे वाचनीय व संग्राह्य लेख येतील. या विशेषांकाची किंमत एक रु. असली तरी साईलीलेच्या वर्गणीदारांस तो त्याच वर्गणींत मिळणार आहे. तरी अनेकांनीं साईलीलेचे वर्गणीदार होऊन तो अंक मिळवावा अशी विनंती आहे. साईलीलेची वा. व. आमची ५ रु. आहे. कोणत्याही महिण्यापासून वर्गणीदार होतां येतें.

### सुखदुःख ही ईश्वरी योजना

जो मनोभावें भगवंताचा भक्त झाला. त्याचें कधीही पतन होऊं शकत नाहीं. तो एकेक पायरी चढत यशाचें शिखर गाठूं शकतो. यासाठीं प्रत्येकानें संसारांत वावरत असतां व उद्योगधंदे हाताळीत असतां भगवंताच्या सरणाला अखंड चिकटून राहिलें पाहिजे.

## आपलें कर्तव्य कोणतें ?

आपल्या वाट्यास आलेली बरी वाईट परिस्थिति ही ईश्वरी योजना आहे याबद्दल कोणालाही दोष देण्याचें कारण नाहीं. तुम्हीं अमूक स्थितीची अपेक्षा केली म्हणून ती तुम्हांला मिळाली असें समजण्याचें कारण नाहीं. तेव्हां तुमच्या मनाप्रमाणें घडलें म्हणून आनंद मानणें व तसें घडलें नाहीं म्हणून दुःखी होणें याला कांहीं अर्थच नाहीं. ईश्वरी योजनेचा त्यायोगें आपण अनादर करीत असतों. वासना, इच्छा, कामना यांचा त्याग करून 'ईश्वरी' योजनेप्रमाणें जी स्थिति वाट्यास आली असेल तिच्यांत समाधान मानून राहाणें हेंच आपलें कर्तव्य आहे.

## दुसऱ्यास दुःख देऊं नका !

आपण कोणालाही दुःख द्यायचें नाहीं किंवा कोणालाही दुःखी करायचें नाहीं हा नियम अंमलात आणण्यासाठी सतत झटलें पाहिजे. कारण ज्याला दुःख द्यायचें तो दुःखी होतोच; परंतु शिवाय दुःख देणाऱ्यालाही दुःखीकष्टी व्हावें लागतें त्याचें काय ? दुसऱ्याला दिलेलें दुःख दुप्पट होऊन आपल्या वाट्यास येत असतें !

## संयोग आणि वियोग !

संयोग आणि वियोग ! जवळ येणें आणि गमावणें ! या दोन्हीं अवस्था-सारख्याच मानायला आपण शिकलें पाहिजे. संयोग झाला तरी त्याचा वियोग कधीं ना कधीं होणार हें निश्चित होय. मग संयोगामुळे आनंद कां वाटावा ? जेथें कधींना कधीं वियोग निश्चित आहे तेथें आनंद कशासाठीं ? यासाठीं व्यक्ति, वस्तु, पैसा, देश व काळ हीं सारीं अनित्य अशाश्वत आहेत. ही भावना अंतःकरणांत, दृढमूळ व्हावी. जें जें दिसतें त्यामुळें सुख किंवा दुःख यांचा लाभ होतो ही कल्पनाच खोटी आहे. त्याची आसक्ति नको.

# श्रीकेशवानंद सरस्वती

लेखक :— नाना अभ्यंकर

संन्यासी, साधू बैरागी वगैरेंबद्दल, माझ्या अगदीं लहानपणापासून मला यत्किंचितहि आदर नसे. केवळ योगायोगानें एका संन्यासी महानुभावाचा नि माझा परिचय झाला. त्याचें असें झालें :

बहुधा १९२२–२३ साल असावें. मी नॅशनल मेडिकल कॉलेजांत दुसऱ्या वर्षांत शिकत होतों. माझ्या शेजारींच दिगंबर भिडे यांचें घर व शेती-वाडी वसई तालुक्यांतील निर्मळ या क्षेत्रीं होती. त्याची आई गेले एकदोन महिने फारच आजारी असल्यामुळें निर्मळला जाऊन रहाण्याकरितां त्यानें तीन आठवड्यांची रजा घेतली होती. त्याच वेळीं आमच्या कॉलेजलाहि दिवाळीची सुट्टी झाली होती. दिगंबर मलाहि आपल्याबरोबर घेऊन गेला.

निर्मळला आद्य श्रीशंकराचार्यांची समाधि असून त्या समाधीवर एक देऊळहि बांधलेलें आहे. आंघोळ वगैरे आटोपून मी समाधीचें दर्शन घेण्यासाठीं निघालों.

निर्मळ गांवाचा जो मुख्य रस्ता आहे त्या रस्त्यावरून देवळाकडे जायला निघालें म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूंस दोन तळीं लागतात. मी जाऊं लागलों तेव्हां उजव्या हातच्या तळ्यांत मुबलक पाणी असून त्यांत सुंदरपैकीं कमळेंहि उमललेलीं दिसत होतीं. ती शोभा पाहात पहात मी जात असतांना तळ्याकडे तोंड करून बसलेल्या एका व्यक्तीकडे माझें लक्ष वेधलें. त्या व्यक्तीची रस्त्याकडे पाठ असल्यामुळें त्या व्यक्तीचा चेहरा कांहीं मला दिसत नव्हता. पण त्या व्यक्तीचें डोकें मला दिसत असल्यामुळें ते कोणीतरी संन्यासी महाराज आहेत हें मला तेव्हांच समजलें.

मी कांहीं वेळ देवळांत बसलों, नंतर त्या देवळाभोवतीं असलेल्या मोठमोठ्या वृक्षांची शोभा पाहिली आणि घरीं येण्यासाठीं निघालों. मघांची ती व्यक्ति अजून तिथेंच आहे कीं निघून गेली आहे हें जाणण्याच्या कुतूहलानें मी डावीकडे पहात चाललों होतों.

संन्यासी महाराज अजून तिथेंच होते.

आतां मात्र त्या व्यक्तीचा चेहरा पाहून ठेवण्यासाठीं मी तळ्याकडे जाऊं लागलों. थोडासा पुढें गेल्यावर ती व्यक्ति संपूर्णपणें विवस्त्र असल्याचें माझ्या लक्षांत आल्यामुळें आणखी पुढें जाण्याचा मला संकोच वाटूं लागला. परंतु माझ्या पावलांची चाहूल लागल्यामुळें त्या व्यक्तीनेंच मागें वळून पाहिलें नि म्हटलें, 'अरे, ती माझी लंगोटी वाळली आहे का पहा बरं!'

त्या व्यक्तीची कांति लिंबासारखी दिसत असून चेहऱ्यावरील तेज तर नुसतें ओसंडून जात होतें. मी आणखी पुढें गेलों. लंगोटी वाळली होती. उघड्या डोक्यावर टोपी घालतांना जितक्या सहजपणें आपण ती घालतों तितक्या सहजपणें ते संन्यासी महाराज लंगोटी नेशीत होते!

माझ्या खांद्यावर हात टाकून ते माझ्याबरोबर निघाले. मी त्यांना आमच्या घरीं घेऊन आलों. त्यांना ओटीवरील झोपाळ्यावर बसवून त्यांना चहा घेऊन येण्यासाठीं मी आंत गेलों. बाहेर कोणी संन्यासी आले आहेत हें समजल्यावर दिगंबर ओटीवर आला. त्याला त्या संन्यासी महाराजांनीं गांजाची व्यवस्था करण्यास सांगितलें. दिगंबर अतिशय भाविक होता. गांवांत चौकशी करून तें व्यसन नियमितपणें करणाऱ्या एका माणसाला तो त्याच्या सरंजामानिशीं घेऊन आला.

चहा वगैरे झाल्यावर त्या नवीन आलेल्या माणसानें गांजाची पत्ती मळायला सुरवात केली आणि दिगंबर आंत निघून गेला. त्या दोघांनीं ती चिलीम संपविल्यावर स्वामींनीं चिलमीच्या तळाशीं जमलेली राख माझ्या हातावर ओतली व म्हटलें, 'ही राख थोड्याशा पाण्यांत टाकून आईंना प्यायला दे. ही त्यांच्या पोटांत गेल्याबरोबर त्या खडखडीत बऱ्या होतील.'

ती राख तशीच हातावर ठेवून मी आंत गेलों. पण स्वामींनीं सांगितलेली गोष्ट दिगंबरला सांगण्याचा मला धीर होईना. ओढलेल्या गांजा तंबाखूची राख पाण्यांत घालून आजारी माणसाला प्यायला द्यायची म्हणजे त्याला उद्यां येणारें मरण आजच यायचें, अशी माझ्या मनाला भीति वाटत होती. पण न जाणों, ज्या माणसाला ती द्यावयाची, त्याची अशा गोष्टीवर श्रद्धा असली तर आपण त्याच्या श्रद्धेच्या आड कशाला या, अशा विचारानेंच केवळ मीं ती राख फेकून दिली नव्हती!

दिगंबरचें व त्याच्या आईचें माझ्या हाताकडे लक्ष गेलेंच व दिगंबरनें त्याबद्दल पृच्छाही केली. मी स्वामींचा निरोप त्याला सांगतांच त्यानें तो आपल्या आईला समजावून सांगितला. त्या दोघांनींही स्वामींचा निरोप मान्य करण्याचें ठरविलें. दिगंबर एका कपांत पाणी घेऊन आला आणि माझ्या हातावरील राख त्यांत टाकण्यास त्यानें मला सांगितलें. त्याच्या आईनें भक्तीभावानें हात जोडले आणि तें पाणी पिऊन टाकलें ! आणि काय आश्चर्य ! गेले दीड दोन महिने अंथरुणाला खिळून राहिलेली ती माऊली पांच मिनिटांच्या आंत उठून बसली नि म्हणाली, ' मी आतांच्या आतां आंघोळ करून स्वामींसाठीं जेवण तयार करणार !' आणि खरोखरच ती आंघोळ करायला निघून गेली.

आमच्या आग्रहावरून स्वामी भोजनासाठीं थांबले. पण पानावर बसल्यावर ते म्हणाले, 'मी आतां व रोज दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास तुमच्याकडे जेवायला येईन. पण मी फक्त एक वाटीभर भात आणि तो भिजण्याइतकें दूध इतकाच मी ठराविक आहार घेत जाईन. रात्रीचा मुळीं प्रश्नच नाहीं.'

त्या दिवसापासून स्वामी दररोज दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास भोजनासाठीं यायचे आणि त्यानी सांगितल्याप्रमाणें वाटीभर भात आणि सुमारें अर्धी वाटी दूध एवढाच आहार घ्यायचे ! आणि तोसुद्धां फक्त दुपारीं.

मला हा एक चमत्कारच वाटत होता. दिगंबरची आई इतके दिवस आजारी होती हें आतां कोणालाही खरें सुद्धां वाटलें नसतें !

स्वामी सारा वेळ देवळाच्या बाहेरच्या बाजूला एका पिंपळाच्या झाडाखालीं धुनी पेटवून त्या धुनीशेजारी मुक्काम करून असत. हा सारा प्रकार पाहून मी इतका भारावून गेलों होतों कीं स्वामींचा सहवास जास्तीत जास्त वेळ लाभावा म्हणून तीनचार दिवस मी माझा मुक्कामही त्यांच्या धुनीजवळच ठेवला.

स्वामी बहुतेक वेळ सर्वसाधरण गोष्टी बोलत असले तरी त्यांच्या भोंवतालची गर्दी कमी झाली कीं ते हमखास अध्यात्माकडे वळत. त्यांच्या उपदेशाचें सार म्हणजे, ' सत्यापरता नाहीं धर्म ' आणि ' परमेश्वरानें ज्या वेळीं जें काम तुमच्यासाठी नेमलेलें असेल तें आपलें सर्वस्व पणाला लावून करीत जा !'

हा माझा स्वभावधर्मच असल्यामुळें मला स्वामीचा हा उपदेश अतिशयच रुचत असे.

मे महिन्याच्या सुटींतहि स्वामींचा मुक्काम निर्मळला असल्यामुळें मी त्या सुट्टींतही मुद्दाम निर्मळला गेलों. दिगंबरच्या आजोळचें घर आगाशी येथें. गेलीं कांहीं वर्षें तें रिकामेंच होतें. तें त्यानें स्वामींना रहायला दिलें. घर साफसूप करण्याचें काम तीनचार दिवस चाललें होतें. नंतर आवारांतील एक खूप मोठा दगड जमिनीच्या थोडा वर आलेला असल्यामुळें तो तेथून काढून टाकण्याचें स्वामींनीं ठरविलें. तो दगड जमिनींतून खणून बाहेर काढल्यावर तो तिथून हालवून दूर फेकून द्यायला कमींत कमी पंधरावीस माणसें तरी लागलीं असतीं. म्हणून ते गडी लोक गांवांतून कांहीं माणसें आणायला गेले. स्वामींना हें समजल्याबरोबर ते हसायला लागले आणि तो अवाढव्य आकाराचा दगड लीलेनें उचलून आवाराच्या बाहेर त्यांनीं फेकून दिला. डोळ्यांवर विश्वास बसणें कठीण पडावें अशासारखाच हा चमत्कार होता.

कां तें देवाला माहीत, पण स्वामींचा माझ्यावर अतिशय लोभ होता. मला ते नेहमीं तो ठराविक उपदेशच करीत आणि मलाही तो पटत असे.

त्यानंतर १९३४ सालापर्यंत म्हणजे जवळ जवळ बारा वर्षें त्यांची व माझी भेट झाली नव्हती. माझ्या एका स्नेह्यानें एका सावकाराकडून दोन हजार रुपये उसने घेतले होते व त्या प्रॉ. नोटवर त्या सावकारानें माझीहि सही घेतली होती. सदर स्नेही सरकारी नोकर असून त्याच्या मालकीचें मुंबईंत एक घरहि होतें. पण त्या माणसाकडून अडीच वर्षांत एक पैसाहि परत न मिळाल्यामुळें व मला अनेक मित्रमंडळींचें साह्य मिळण्यासारखें असल्याचें माहीत असल्यामुळें सदर सावकारानें त्या माझ्या सहीच्या जोरावर मला दिवाणी तुरुंगांत बसविण्याचें ठरवून माझ्यावर वॉरंट काढलें. मी त्या रकमेंतली एक पैहि घेतलेली नव्हती. पण मला दिवाणी तुरुंगांतून सोडविण्यासाठीं माझी मित्रमंडली ताबडतोब ती रक्कम भरून टाकील अशी माझी खात्री होती पण त्यांनीं हा भुर्दंड विनाकारण करूं नये अशी माझी इच्छा होती. म्हणून या बाबतींत माझ्या मित्रांनीं कांहींहि करूं नये असें दिगंबरला सांगण्यासाठीं मी निर्मळला गेलों.

त्यापूर्वींच आठ दिवस स्वामी वसईला येऊन राहिले होते. मी आणि दिगंबर स्वामींच्या दर्शनाला गेलों. मला पाहिल्याबरोबर स्वामी मला म्हणाले, 'मी सांगितल्याप्रमाणें वागतो आहेस तोंपर्यंत प्रत्यक्ष सैतान सुद्धां तुझ्या केंसाला धक्का लावूं शकणार नाहीं.'

आणि कोर्टांत उभें राहिल्यावर मी सावकाराला सांगितलें, 'तुझ्या पैशां-पैकीं एक पै सुद्धा मी घेतलेली नाहीं. या भानगडींत माझ्या मित्रांनीं पडतां कामा नये असें मी त्यांना बजावून सांगितलें आहे. लक्षांत ठेवा, जग कितीहि व्यवहारी झालें तरी परमेश्वर सत्याचा वाली आहे अशी माझी श्रद्धा आहे.'

माझ्या पोटगीचे पैसे सावकार कोर्टांत भरणार तोंच कोर्ट बंद होण्याची वेळ झाली. दुसऱ्या दिवशीं कोर्टांत हजर होण्याबद्दल आम्हां दोघांनाहि मॅजि-स्ट्रेटचा हुकूम झाला!

रात्रीं आठ वाजतां सावकाराकडून त्याला भेटण्याबद्दल मला निरोप आला. मी जाऊन पहातों तों त्याला अर्धांगवायूचा झटका सायंकाळीं सातच्या सुमारास आल्याचें समजलें. मला खरोखरच अतिशय वाईट वाटलें. सावकारानें त्या प्रत्यक्ष ऋणकोकडून पैसे वसूल करण्याचें ठरविलें होतें.

योग्य वेळीं त्याचे पैसे परत झालेच पण तीनचार महिन्यांत तो सावकार खडखडीत बराहि झाला!

१९५२ सालीं या स्वामींची नि माझी नाशिकला भेट झाली. त्यांनीं पुन्हा तोच उपदेश करून त्याप्रमाणें मला वागण्यास सांगितलें आणि इतक्या जलद निघून गेले कीं त्यांच्या पाठोपाठ जाणें मला अशक्य झालें.

त्यानंतर आठच दिवसांनीं त्यानीं समाधि घेतल्याचें मला वृत्तपत्रावरून समजलें.!

# कल्याणकारी कथा

—सन्त विनोबा

एकदा गंमत झाली. चालता चालता पायात काटा मोडला. काठा मोठा होता. सारं शरीर वेदनेनं शहारून गेलं. बोटं त्या रुतलेल्या काट्याकडे धावली आणि चिमटीत धरून काटा काढू लागली. शेवटी काटा निघाला, पण अर्धा त्याचा काहीभाग खुडलेल्या अवस्थेत पायातच राहिला. त्यामुळं वेदना तशीच कायम राहिली. डोळ्यात पाणी जमलं. चेहरा उदास दिसू लागला. जेवणाची इच्छा राहिली नाही. काही ऐकण्याची, कोणाशी बोलण्याची आवड राहिली नाही.

अखेर पायांत पू झाला आणि त्याबरोबर तीन चार दिवसांनी काटा पायातून बाहेर पडला. आता वेदना थांबली. जेवण सुरू झाले. आल्या–गेल्याशी बोलण्याचा उत्साह वाढला. हसणं खेळणं सारं पूर्ववत् सुरू झालं

यावरून विनोबा म्हणतात कीं जो नियम शरीराचा तोच नियम गावाचा आहे. शरीराचा कोणताहि अवयव दुःखी झाल्याबरोबर त्याचा परिणाम अवघ्या शरीरावर होतो. तसंच गावाचा एक कारागीर वा कुटुंब यांवर आलेल्या आपत्तीचा परिणाम साऱ्या गावावर होत असतो.

समजा कीं आपल्या गावात एक श्रीमंत माणूस आहे. तो शहरात राहतो. त्याचा मुलगा बाटाच्या दुकानात जातो आणि सुंदर, चमकदार किंमती जोडे घेऊन जेव्हा खेड्यात येतो तेव्हा स्वाभाविकपणेच त्या जोड्यांविषयी गावच्या पोरांना आकर्षण निर्माण होतं. मग तेहि शहरात जातात आणि तसले जोडे खरेदी करतात. इकडे गावचा चांभार बिचारा रोजगारीविना उपाशी मरतो.

याचा परिणाम स्पष्ट आहे. चांभाराला रोजगारी मिळत नसल्यानं तो आपल्या मुलांसाठी कपडे घेऊ शकत नाही. याचा परिणाम शिंप्यावर होतो. आणि अशा प्रकारे हे दुष्टचक्र साऱ्या कारागिरांवर वरवंटा फिरवून जातं.

म्हणून कोणीहि स्वतःपुरता, स्वतःच्या सुखदुःखापुरता विचार करून भागत नाहीं. प्रत्येकानं गावाच्या सुखदुःखाशी आपलं सुखदुःख जोडलं पाहिजे. गावातला कोणीहि माणूस बेकार राहणार नाही. उपाशी राहणार नाही, वस्त्रविहीन राहणार नाही याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

गाव आणि मानवी शरीर या दोघात सारखेपणा आहे तो या अर्थानं. शरीराच्या एका अवयवाचं स्वास्थ्य बिघडलं तरी सारं शरीर निकामी होतं. गावाच्या एका कुटुंबावर संकट आलं तरी सारा गाव त्या संकटात गुरफटतो.

## चार चोर !

चार चोरांची एक चौकडी होती. ते चौघेही एकत्र चोरी करायला निघत. कुणी पहात आहे असं वाटलं की चौघंहि लपून रहात. सारी कामं ते एकोप्यानं करीत. पण मनातल्या मनात कुढत रहात. दुःखी रहात.

एकदा त्यांनी एक मोठी चोरी केली. त्या चोरीत त्यांना एक पेटीभरून सोन्याचांदीचे दागिने आणि हिरेमोत्यांच्या वस्तू मिळालया. सारा माल घेऊन ते

चुपचाप रानात गेले. दूर कुठेतरी एखाद्या झाडाखाली बसून निवांतपणे वाटणी करण्याचा त्यांचा विचार होता. चोरी मोठी होती म्हणून त्यांचा आनंदहि मोठा होता. त्यांनी आपल्यापैकी दोघांना मिठाई आणायला पाठविलं आणि दोघांनी माल वाहून नेण्याचं काम अंगावर घेतलं.

मिठाई घेण्यासाठी दोघं निघाले, पण रस्त्यानं चालतांना त्यांच्या मनात पापाचा विचार आला. एकजण म्हणाला,

"आपण मिठाईत थोडं विष घालू या."

"बरं होईल. सारा माल आपला होईल." दुसऱ्यानं दुजोरा दिला.

इकडे चोरीचा माल वाहून नेणारे जे दोघं होते त्यांचंहि मन वाईट विचारानं घेरलं. त्यांनी चालता चालताच विचार विनिमय केला आणि मिठाई आणणारांना पाण्यासाठीं पाठवून विहिरीत ढकलून द्यायचं ठरवून टाकलं.

अशा प्रकारे दोन्हीकडे वाईट विचार सुरू झाले. तिकडे दोघांनी मिठाईत विष कालवून घेतलं आणि झाडाजवळ आले. इकडे दोघं त्यांची वाटच पहात बसले होते. आल्याबरोबर त्यांनी म्हटलं:

"अरे, किती उशीर खूप तहान लागली बुवा. केवढं मोठ ओझं होतं हें! आमच्यासाठी पाणी घेऊन येता कां?"

मिठाईवाले चोर मिठाईचा पुडा तिथंच ठेवून पाणी आणायला विहिरीवर गेलें. या दोघांचा मनसुबा झालेलाच होता. पाठीमागून दोघंही धांवत गेले आणि धक्का देऊन त्यांना विहिरीत ढकलून दिलं.

आतां दोघांनी सुटकेचा श्वास सोडला आणि माघारी परतले. मिठाईचा पुडा त्यांची वाट पहातच होत.मिठाई खायची आणि चोरी वाटून घ्यायची असा विचार करून त्यांनी मिठाईवर ताव मारायला सुरुवात केली.

मिठाई विषारी होती. दोघांनीही चारदोन घास खाल्ले आणि जमिनीवर कोलमडले. चोरीचा माल तिथंच पडून राहिला. चारही चोरांची वासलात लागली.

जो दुसऱ्याच्या वाईटाची इच्छा करतो त्याचं स्वतःचही वाईट होत असतं. विनोबांनी यावर तोडगा काढला आहे. भूदानाचा विचार म्हणजे चांगुलपणाचा, सज्जनपणाचा विचार. विनोबा म्हणतात आपल्यासाठी काटे पेरण्यालाही तुम्ही फुलें द्या. वाईट करणाऱ्याचें शुभचिंतन करा. याचा फायदा चांगला होईल. वाईट माणूससुद्धा हळूहळू चांगला होईल, सज्जन होईल.

# नवा नेता

एका गावात एक अनुभवी आणि वृद्ध पुढारी होते. ते गावाच्या भल्याचा विचार करीत आणि गावही त्यांचं मनापासून ऐके. त्यांनी कधीच कोणावर अन्याय होऊ दिला नाही.दीन-दुर्बलांचा ते खरा आधार होते. त्यांच्या नेतृत्वामुळं गाव आपल्या समृद्धीसाठी आणि एकीसाठी तालुकाभर प्रसिद्ध होता.

परंतु आतां त्यांचं म्हातारपण आलं होतं. त्यांना चिंता पडली की माझ्या पश्चात् गावचं नेतेपण मीं कुणाला देऊ ? या कामासाठी गावचे तीन तरूण त्यांच्यासमोर आले.

एक दिवस त्यांनी त्या तिघाही तरुणांना बोलवून घेतलं आणि सायंकाळच्या वेळी गावाबाहेर यायला सांगितलं. तिथं एका नाल्याचं बांधकाम सुरू होतं.

हे तीनही तरुण नाल्याजवळ आले. परंतु तिथं हे पुढारीबाबा नव्हते. या तरुणांना नवल वाटलं आणि पुढारीबाबांच्या या वागण्याबद्दल थोडा रागही आला. शेवटी हे तिघंही परत फिरले. जातांना त्यांनी एका शेतकऱ्याची गाडी दलदलीत पडलेली पाहिली. तो शेतकरी बिचारा गाडी बाहेर काढण्याची खटपट करीत होता. अंधार होऊ घातल्यानं तो घाबरून गेला होता.

गाडीवानानं त्या तीन तरुणांना पाहिलं आणि मदतीसाठी हाक मारली. तरुणांनी विचार केला की चिखलातलं काम आहे. कपडे कशाला घाण करून घ्या. एक म्हणाला,

"मला घरी महत्त्वाचं काम आहे." दुसरा म्हणाला, "माझे वडील माझी वाट पहात असतील." असं म्हणून दोघेही निघून गेले.

परंतु तिसरा तरुण या दोघांपेक्षा वेगळा होता. त्यानं विचार केला कीं या बिचाऱ्या गाडीवानाला आपण मदत नाही करायची तर कोणी करायची ? त्यानं शर्टाच्या बाह्या वर सरकवल्या. ओचे खोवले आणि गाडीचं चाक लोटूं लागला. लवकरच गाडी दलदलीतून बाहेर आली. गाडीवान दुसरा कोणी नसून गावचे पुढारीबाबाच होते ! त्यांनी तोंडाला धाटा बांधल्यामुळं कोणीच त्यांना ओळखू शकलं नव्हतं.

पुढारीबाबांनी त्या कामसू तरुणाची पाठ थोपटली. आणि त्याच्या गळ्यांत गावच्या नेतेपणाची माळ घातली. गावाला सेवाभावी आणि कामसू नेता मिळाला.

लोकांनी पुढारीबाबांचं आणि आपल्या नव्या नेत्याचं मनापासून स्वागत केलं !

---*---

# शिरडी–वृत्त

## जुलै १९६८

या महिन्यांत शिर्डीस बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणेंच होती. बाहेरगांवचे भक्त येतात पण राहत नाहींत. ताबडतोब स्नान, दर्शन, पूजन, भोजन करून जातात. शिरडीस मुक्काम करून राहणारे भक्त या महिन्यांत थोडे होते. कांहीं कलाकारांनी श्री पुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें:—

**कीर्तन—**

श्री. ह. द. प. रामराव गोविंदराव पाटील मु. पेठ ता. चिखली. जि. बुलढाणा ( विदर्भ ), श्री सौ. कमलाबाई शालिग्राम रत्नपारखी मु. म्हैसपूर, श्री. दत्तात्रय दामोदर रासने ( नानासाहेब ) मु. पुणें; श्री. विठ्ठलराव मराठे ( संस्थान गवई ) नेहमींप्रमाणें कीर्तनें झालीं.

**गायन—**

श्री. श्रीपाद शंकर साठे. मु. परनानगर, श्री. जगन्नाथ पंडित साकोरीकर साकुरी; श्री. राजेश्वर शंकरराव देशमुख अमरावती.

**नकला व गारुड—**

श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणें; श्री. बाबुराव पांडुरंग सोनावणें कोपरगाव; श्री. विठोबा तात्या पाटील लभडे, निवगांव.

वृत्त–विशेष—

आषाढ महाएकादशीनिमित्त श्रींच्या पालखीची गावांतून मिरवणूक भजनी दिंडी गारूड भारूड नकला वगैरे. श्री संतनामदेव, श्री संत सावतामाळी पुण्यतिथीनिमित्त कीर्तन, भजन, गायन संस्थान गवई विठ्ठलराव मराठे व श्री. ह. दा. रासने नानासाहेब या उभयतांचें झालें. पन्नासाव्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त निरनिराळी नवीन बांधकामें चालू आहेत.

**हवापाणी—**

शिर्डी येथील हवापाणी. पाऊस झिमझिम चालू असून हवेंत गारवा आहे. रोगराई नाहीं.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality–by Pradhan | | | १–०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. थोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१७) | Guide to Shirdi | (English) | | ००–१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00–37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00–50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मुद्रक : **पांडुरंग दाजीबा मोरे** निर्णयसागर प्रेस, २६।२८ डॉ. एम्. बी. वेल्कर स्ट्रीट, मुंबई २

संपादक व प्रकाशक : **द. दि. पाटणकर,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.